

कथा

वार्ता

कहानी

अर्धांगी

नोव्हेंबर - २०१३



दिपावली



विशेषांक

संपादक

* मीना त्रिवेदी
* अलका असेरकर

कथा - पान क्र.

प्रस्तावना- प्रा.अदिती मुळ्ये	४
झाले मोकळे आकाश - सुषमा आर्या	८
पती, पत्नी आणि ..ती – प्रिया प्रभुदेसाई	१२
मित्र – स्मीता वैद्य	१६
मला बायको हवी – सुनिला शिरूर	२०
टिचकी मारूनी जावे – शालिनी कुलकर्णी	२४
मग माझे घर कुठे आहे – मीना त्रिवेदी	२७
निरूत्तर – अलका गांधी-असेरकर	३०
काटा रुते कुणाला – अर्चना कुलकर्णी	३९
વ્હિલરના સ્ટૉલ પાસે - રાજૂ પટેલ	૪૭
સાથ – રાજૂલ ભાનુશાલી	૫૦
सज़ा - अलका सिंह	૫૨

संपादकीय -

फेसबुकवरील 'अर्धांगी' या स्त्री-जाणीवा व्यक्त करणा-या ग्रुप प्रोफाईलचा हा तिसरा ई-अंक...यापूर्वी दोन अंक प्रकाशित झाले. पैकी पहिला अंक हा विविध साहित्याने नटलेला होता, तर दुसरा फक्त कवितांचा अंक, जो ८ मार्च २०१३ ला जागतिक महिला दिनाचे निमित्त साधून प्रकाशित केला गेला होता..

हा तिसरा अंक, अकरा कथांचा दिवाळी अंक म्हणून प्रकाशित करताना आनंद होतोय..विशेष म्हणजे या अंकात दोन गुजराती कथाही आहेत, तसेच एक हिंदी कथा आहे...अर्धांगी हे सर्वभाषीय सदस्यांचं या विषयावर व्यक्त होण्याचं व्यासपीठ व्हावं हाच त्यामागील उद्देश...

नेहमीप्रमाणेच या अंकात देखील लेखन करणारे हे 'अर्धांगी' या ग्रुप प्रोफाईलचे सदस्य असून, यातील अनेक हे रुढार्थाने लेखक नाहीत. तरीही त्यांनी या कथा लिहिण्याचा प्रयत्न केलाय तो म्हणजे निव्वळ स्वतः घेतलेल्या, पाहिलेल्या अनुभवांवरून...अर्थात हे अनुभव वैयक्तीक असतील किंवा समाज जीवनातून पाहिलेले असतील...

या सर्व कथा वाचून आपल्या व्यस्त वेळापत्रकातून खास वेळ काढून प्रा.अदिती मुळ्ये यांनी या अंकाकरिता आपली प्रस्तावना लिहून दिली याकरिता त्यांचे धन्यवाद. दिपा गुजर हिने प्रुफ रिडींगचे काम पाहिले. त्याचप्रमाणे सर्व लेखक-लेखिकांचेही मनापासून धन्यवाद. डॉ.अलका सिंह यांनी देखील आपल्या व्यस्त दिनक्रमातूनच नव्हे तर डेंग्यूने आजारी असतानाही, आणि केवळ एकदा सांगूनही, वेळ काढून, अगदी रात्री जागूनही कथा लिहून पाठवून दिली त्यांचे विशेष आभार.

काही त्रूटी राहून गेल्या असतील तर त्याची जबाबदारी संपादकांची समजून, वाचकांनी उदार मनाने हा एक वेगळा प्रयत्न म्हणून याकडे पाहून आपली दाद ardhangi@ymail.com *वर नोंदवावी ही अपेक्षा नक्कीच आहे.*

सर्व वाचकांना दिवाळीच्या मनापासून शुभेच्छा....

(टीप - अंकातल्या साहित्यातील मतांशी इथले संपादक सहमत असतीलच असे नाही)



प्रस्तावना – अदिती मुळ्ये

अलका गांधी-असेरकर आणि मीना त्रिवेदी या दोघींनी संपादित केलेला "अर्धांगी"चा दिवाळी अंक आपल्या भेटीला आला आहे. या सगळ्या कथा या तुमच्या-आमच्यासारख्याच प्रस्थापित नसणा-या लेखक-लेखिकांनी लिहिल्या आहेत. पण जेव्हा या कथा आपण वाचायला लागतो, तेव्हा सुरेख आणि सहज शैली आणि त्याहीपेक्षा त्यामध्ये ज्या ताकदीने स्त्रियांचे प्रश्न आणि स्त्री-मनाची स्पंदनं व्यक्त होताततेे पाहून या सा-या जणींना साहित्याच्या क्षेत्रात नक्कीच उज्ज्वल भविष्य आहे.

"झाले मोकळे आकाश" ही सुषमाची पहिली कथा. मुलीला पाळी येणं हा तिच्या आयुष्यातला महत्वाचा टप्पा... खरं तर स्रीत्वाची सुरवात...एक सुंदर नैसर्गिक वळण! नेमकं तिथंच तिच्या सा-या बंधनांना सुरवात होते. तिच्या सगळ्या मुक्त अविष्कारांवर बंधनं लादली जातात. ज्या समाजात उघड उघड लिंगपूजा केली जाते, त्याच समाजाचा हा दांभिकपणा. सुषमाच्या कथेतल्या आईच्या पहिल्या पाळीच्या अनुभवातून कथेला सुरवात होते आणि तिच्या मुलीच्या त्याच टप्प्यावर हे वर्तुळ पूर्ण होतं. अर्थातच भक्कम आशावादाचं अश्वासन देऊन. खूप थोड्या शब्दात बरंच काही सुचवून जाणं, सांगून जाणं हे सुषमाच्या शैलीचं वैशिष्ट्य.

गेल्या काही वर्षात 'ग्लोबलायझेशन' आपल्या घरात येऊन पोचलंय आणि त्याबरोबरच चंगळवादही येऊन चांगलाच स्थिरावलाय. एकंदरच जीवनशैली आणि जीवनमूल्यांवर जोरदार परिणाम होताना दिसतायत. एकीकडे बायका शिकतायत, आपल्या गुणवत्तेच्या जोरावरती आर्थिक प्रगती पण करतायत, पण त्याच वेळी ज्याला फारशी वैचारिक बैठक नाही असा बेदरकार व्यक्तीवाद पण फोफावताना दिसतोय. प्रिया प्रभुदेसाईच्या "पती, पत्नी आणि ती" या कथेतले दीप्ती आणि शेखर हे त्या व्यवस्थेचे प्रतिनिधी आणि बळीही. या बदललेल्या व्यवस्थेत कुटुंबसंस्थेचा नव्यानं विचार करायला हवाय, जुन्या चौकटी मोडून. अर्थात त्याकरता पुरूषांना वैचारिक आणि नैतिकदृष्ट्या प्रगल्भता आल्याशिवाय हे होणार नाही. कारण स्त्री-पुरूषांच्या कोणत्याही रिलेशनशिपमध्ये (लग्न किंवा लिव्ह-इन) कमिटमेंट अर्थात जबाबदारीची जाणीव हा महत्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे सध्या तरी भावनिकदृष्ट्या बाईच यामध्ये दोन्ही बाजूंनी भरडली जात आहे. दोन-चार पिढ्यांपूर्वीची कोकण-गोवा भागातील खोत आणि भावीण या नात्याची शेखर-दीप्तीच्या नात्याशी केलेली तुलना कथेला वेगळ्याच पातळीवर नेते.

"मित्र" ही स्मिताची एक प्रसन्न कथा आहे. तिची शैलीही तशीच आल्हाददायक आहे. एखादा झरा झुळझुळ वहात जावा तशी नायिकेच्या मनातली हळूवार स्पंदनं ती उलगडत नेते. एका साध्याशा घरेलू बाईचा 'फेसबुक'च्या जगातला प्रवेश... त्यातून तिची एकाशी होणारी सहजसुंदर मैत्री! कथेत खरं तर काहीच विशेष घडत नाही. पण टिपिकल मध्यमवर्गीय चौकटीतली साधी-सोज्वळ नायिका आणि तिचा त्या मित्राला (चोरून) भेटण्यापर्यंतचा हा प्रवास फार छान, नाजूकपणे वर्णन केलाय. आता पुढे तो प्रवास कोणत्या वळणावर जाईल हे वाचकांच्या कल्पनाशक्तीवर सोडून दिलं आहे.

"मला बायको हवी" ही सुनिला शिरूर यांची लक्षणीय कथा. एका घरातील कॅन्सरग्रस्त बायको आणि दुस-या घरातील कॅन्सरग्रस्त नवरा अशी ही दोन कुटुंबं. ट्रीटमेंटच्या निमित्तानं एकत्र येतात, ओळख वाढते. स्त्री म्हणून सर्व बाबतीत आदर्श असणारी गौरी नव-याची ज्या मायेनं काळजी घेते, घरदार सांभाळते, ते पाहून एका क्षणी नीलिमाला असं वाटून जातं की 'मला अशी बायको हवी'... हे खूप मजेशीर

वाटता वाटताच ब्लॅक ह्यूमरच्या बाजूला कधी झुकतं कळत नाही. लौकिकार्थानं सर्व दृष्टीनं सुखी असणा-या स्त्रीच्या मनाचा दुखरा कोपरा या कथेत तरलपणे व्यक्त होतो.

एका निवृत्तीकडे झुकलेल्या मनात लहानपणच्या "टिचकी मारून जावे" या खेळाची गोड आठवण येते आणि त्याला जोडून अनेक आठवणी उलगडत जातात. बाईच्या कपाळावर टिकली लागते तेव्हापासून हाच खेळ आयुष्यभर 'टेकन फॉर ग्रँटेड' या स्वरूपात बाईला खेळावा लागतो, हे वास्तव खाडकन समोर येतं. शालिनी कुलकर्णींनी ते फारच सुरेख मांडले आहे.

मीना त्रिवेदी यांची "मग माझे घर कुठे आहे?" ही कथाही बाईच्या उपरेपणाला पुन्हा एकदा अधोरेखित करते. आधी वडिलांचं घर, मग नव-याचं आणि शेवटी मुलाचं, असा प्रवास करणा-या भारतीय स्त्रीला पडणारा हा सनातन प्रश्न... कितीही सुसंस्कृत आणि मनासारखा नवरा आणि सासर मिळालं तरी बाईला आयुष्यात एकदा तरी हा प्रश्न सामोरा येतो आणि छळतोच. ज्या घरासाठी ती आपलं तन-मन-धन पणाला लावते, ते घर कधी आपलं नव्हतंच ही जाणीव कधी ना कधी तिचं आयुष्य तिला करून देतंच. त्यातही न मिळवत्या स्त्रीला हा प्रश्न सतत घाबरवत असतो. आपल्या आया-आज्या याच तर गोष्टीला घाबरून कधी बंड करायला धजल्या नाहीत. मीना त्रिवेदीची कथा त्यामुळे आजही ताजीच!

अर्चना कुलकर्णीच्या "काटा रूते कुणाला" मध्ये आयव्हीएफ सेंटरमध्ये काम करणारी रेवा तिच्या सेंटरमध्ये येणा-या गौरीच्या दुःखानं आणि नंतर तिच्या अपघाती मृत्यूनं व्यथित होते. गौरीला न्याय मिळावा म्हणून नारी समता मंचाकडे आपलं मन मोकळं करते, त्यावेळी आपली स्वतःची वेदनाही व्यक्त करते. या दोघींच्या गोष्टी परत बाईच्या एकंदरच अस्तित्वाबद्दल प्रश्नचिन्ह उभं करतात.

अलकाची "निरूत्तर" ही कथा लक्षणीय म्हटली पाहिजे, कारण एक चाकोरीबाहेरचा प्रश्न त्यामध्ये मांडलाय. बाईच्या भावनिक गरजा आणि त्यातून येणारं असमाधान, या सा-याबाबत खूप बोलणं-लिहिणं होतं. तिच्या शारीरिक गरजेकडे आजही

हेटाळणीनं पाहिलं जातं. त्यासाठी लग्नाशिवाय पर्याय नाही. आणि मग एका गरजेसाठी सा-या नको असलेल्या तडजोडी करणं भाग पडतं. अनेकदा त्यात आयुष्याचा आनंदच हरवून जातो. तरूण विधुर पुरूष आपल्या गरजेकरता काही करो, ते खपून जातं. पण तरूण विधवेचं लग्नसुद्धा टीकेचा विषय ठरतं. "निरूत्तर" या कथेतील संध्या जो मार्ग निवडते, तो समाजाला न पचणारा, तरीही तिच्या दृष्टीनं योग्य आहे. अर्थात त्याच्या सा-या परिणामांना सामोरं जायची तिची मानसिक तयारी आहेच. अगदी कथेतही असा विचार मांडणं हे खरोखरच स्वागतार्ह धाडस आहे.

डॉ. अलका सिंह यांची ’सजा’ ही हिंदी कथा एका अपंग मुलीची व्यथा मांडते. उत्तर भारतातील समाजात आजही मुलीचा जन्म म्हणजे आईबापांवर संकटच असतं. त्यात ही मुलगी वांड, मुलांसोबत खेळ आणि मस्ती करणारी. अशीच खेळताना झाडावरून पडते आणि एक हात गमावते. पुढं बाप तिचं लग्न त्याच्याच वयाच्या श्रीमंत माणसाबरोबर लावून देतो. ती बापाला जाब विचारायची हिंमत करते. बापही पुरूषसत्ताक व्यवस्थेचा प्रतिनिधी. त्याचं ऐकून ती उंबरा ओलांडते ते बापाशी कायमचं नातं तोडूनच.

या सगळ्या कथांमधून पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेचा बळी ठरणा-या स्त्रियांची वेदना सहजपणे व्यक्त केली गेलीय. त्यातल्या सा-या जणी, तुम्हा-आम्हाला आपल्या स्वतःशी, तर कधी आपल्या भोवतीच्या अनेकींशी नातं सांगणा-या आहेत. त्यामुळे आपण सहजपणे त्या कथांमध्ये गुंतत जातो. योगायोगानं स्त्रीच्या वयाच्या सा-या टप्प्यांवरील अनुभव या सा-या कथांमधून येतात. "झाले मोकळे आकाश" मधल्या वयात येणा-या मुलीपासून, "टिचकी मारून जावे" मधल्या वयस्क नायिकेपर्यंत हा प्रवास होत जातो. शैली असो की आशयघनता, दोन्ही दृष्टीनं सा-या कथा दर्जेदार आहेत. "अर्धांगी"चे सारे वाचक या माझ्या मताशी निश्चितपणे सहमत होतील.

- अदिती मुळ्ये

दोन गुजराती कथा. त्यातील एक राजू पटेल या एकमेव लेखकाची या अंकातील कथा. 'व्हिलरना स्टॉल पासे'. ही वैवाहीक जीवनात आलेल्या साचलेपणाला कंटाळून सोशल नेटवर्कींगमधून व्हर्च्युअल मैत्रीत अडकलेल्या जोडप्याची आजच्या काळाशी सुसंगत कथा. तसेच गृहीणीचं दुपारच्या वेळचं एकटेपण निसर्गाशी जोडून घेणारी 'साथ' या राजूल भानुशालीच्या कथेतील नायिका.

- अलका असेरकर



झाले मोकळे आकाश........*सुषमा आर्या, मुंबई*

रोज संध्याकाळी दिवेलागणीला सगळेजण त्या भल्या मोठ्या लिंगाला अंगणात ठेवून दुधाने धूवत असत. कुणी तेल-तूप, कुणी दही-मध, तर कुणी त्याच्या डोक्यावर फुलं टाकत. मग तो पूर्णपणे चिपचीपीत व्हायचा. त्यानंतर काही जणी गळा काढून गाणी म्हणायला सुरुवात करायच्या. कर्णकर्कश्श आणि भेसूर अशा आवाजाने माझ्या कानठळ्या बसायच्या. मी कानावर हात ठेवून उभी राहिले; कि आई डोळे वटारायची. मग मी झटकन कानावरून दोन्ही हात बाजूला करायचे. पण मग त्यालाही त्या आवाजाचा त्रास होत असेलच ना..?

आणि सगळं डोकं भादरून आलेले भटजी काका त्याच्यासमोर मोठ्ठा तुपाचा दिवा लावायचे, त्यांचं ते भादरून आलेलं डोकं पाहिलं कि मला त्यांना "ताजी" द्यायची इच्छा व्हायची. माझ्याही डोक्यात जास्त उवा झाल्या कि आई घरीच माझं डोकं

भादरायची. मग सगळे जण मला ताजी द्यायचे. सगळ्यांच्या 'नानाची टांग' म्हणत मी एकेकाला आडवा पाडून मारायचे, मग आई मागून येऊन उलट माझ्याच पाठीत धपाटे घालायची; म्हणायची बाईच्या जातीने जास्त आगाऊपणा करू नये. पुरुषांच्या असं अंगचटीला येऊ नये. मग मी पाठ चोळत रडतच घरी जायची.

आजही आई मलाच ओरडली होती. ही अशी मलाच का ओरडते सारखी ? देवा आता तू ह्या सगळ्यांना शिंकून दाखव म्हणजे ह्यांना कळेल कि तुला ह्या सगळ्याचा त्रास होतोय!!! पण खरच तो ऐकत होता का ? , कि तो फक्त दगड होता एक 'लिंग' असलेल..!!!. त्याचं लिंग, त्या दिवशी मनू च्या बाबाने मला जवळ घेऊन दाखवलं तसंच होतं .... तेव्हा तर आई माझ्यावर जाम भडकली होती. आणि मनूच्या आईशी जाऊन भांडली सुद्धा.......... त्यावेळी मला आई जरा विचित्रच वाटली !!!!

मग एके दिवशी सकाळीच माझ्या पोटात आगडोंब उसळला. आई गंsssss केलं तशी आई धावतच आली. मग आईने मला मोरीत नेऊन माझे सगळे कपडे तपासले. त्या चार दिवसात आई मला त्या लिंगाच्या पूजे जवळ फिरकू देत नव्हती. मगमी खिडकीतूनच सगळ्यांना त्याचा उदोउदो करताना पाहू लागले. हर एक महिन्यातील चार दिवस आई मला मागच्या अंगण्यातल्या खोलीत ठेवूलागली. तिथे खूप कुबट वास यायचा. मला तिथे अजिबात झोप लागत नव्हती. ते चार दिवस आई मला जवळही घेत नव्हती. मग मी एकटीच गुढगे छातीपर्यंत ओढून झोपून जायची.

असेच कितीतरी महिने चालूच होतं. ते चार दिवस आणि त्या दिवसांमध्ये माझ्या आतून वाहणारा तो अखंड झरा मला नकोसा वाटू लागला. माझं कातडं सोलवटून काढू लागला. मग मी पाय फाकवून एकटक छताकडे पाहत राहायची. छताला लागलेली जाळीजळमटे, त्यातून सतत आतबाहेर करणारा कोळी.... ओल लागलेली भिंत...त्यातून आ वासून बाहेर पडलेली पापुदे ... माझं जुनं, आणि फाटलेलं घोंगडं... मला पाणी पिण्यासाठी दिलेला बिनबुडाचा तांब्या त्यातून

घरंगळणारं पाणी आणि त्या पाण्याचे ओघळ उमटलेली ती शेणानं सारवलेली जमीन..................

ते चार दिवस संपले तरीही मी तिन्ही त्रिकाळ तिथेच जाऊन बसायची. बाहेरच्या जगापेक्षा मला त्या बिनबुडाच्या वस्तू जास्त जवळच्या वाटू लागल्या, निदान त्या तरी मला दूर लोटत नव्हत्या. त्यांना माझा कधीच विटाळ होत नव्हता...मी तिथे बसून पुस्तकं वाचू लागले..... "“अगले जनम मोहे बिटिया ना कीजो“.................

आज कित्येक वर्षानंतर, माझी मुलगी अशीच खिडकीजवळ बसून पुस्तक वाचत होती. आज पहिल्यांदाच तिला पाळी आली होती. "माझं झालं ते झालं, माझ्या मुलीला मी या बेगडी संस्कृतीची जराही झळ लागू देणार नाही", असं मनाशी ठरवत मी तिच्याजवळ गेले आणि प्रेमाने तिच्या डोक्यावरून हात फिरवला.

पण मी काही सांगायच्या आतच तिने मला सांगायला सुरुवात केली,

"अगं आई तू टेन्शन घेऊ नकोस. आमच्या शाळेत गेल्या महिन्यातच मासिक पाळीवर लेक्चर्स झाले. अशावेळी स्वच्छता कशी पाळायची. काय खायचं काय प्यायचं ... सगळं सविस्तर समजावून सांगितलं आहे ... तो काय एवढा मोठ्ठा इश्यू नाहीये गं".............

किती सहजपणे ती बोलून गेली; आणि मला हसूच फुटलं. किती मोठी वाटली मला ती त्यावेळी!!!! मी तिला काही समजावून सांगण्याआधी तिनेच मला समजावून सांगितलं.... आजची पिढी प्रगल्भ आहे. माझी मुलगी आजच्या पिढीचं प्रतिनिधित्व करत होती. एका वेळीच आनंद आणि दुःखही दाटून आलं...."खरच..... आई मलाही तू असंच त्यावेळी समजून घेतलं असतस तर"? पण तुही त्याकाळाचं

प्रतिनिधित्व करत होतीस. तुझ्यावरही तेव्हाचे संस्कार होते. कदाचित तुझ्या आईने तुला त्यावेळी माझ्यापेक्षाही वाईट पद्धतीने ट्रीट केलं असेल.......................

नुकताच पाऊस पडून गेल्याने आभाळ मोकळं झालं होतं. आणि आम्ही दोघीही अशाच मोकळ्या. आभाळासारख्या........ खिडकीत बसून ती मला फॅशन मॅगजीन वाचून दाखवू लागली, अणि मी माझ्या हातातील पुस्तक उशी खाली दाबून ठेवलं."अगले जनम मोहे बिटिया न कीजो"... आता त्याची काहीच गरज उरली नव्हती.........................





पती , पत्नी आणि.. ती - प्रिया प्रभुदेसाई - मुंबई

दीप्ती आणि शेखर एकत्र राहायला लागले... माहित आहे तुला ? आईला शॉक बसला आहे." पूर्ती सांगत होती . दीप्ती तिची बहिण. इंजिनिअर. MNC मध्ये चांगली नोकरी ... मोठी पोस्ट , चांगला पगार. स्वतंत्र. अनेक वर्षे लग्नाचे बघत होते तिचे घरचे . पण इच्छाच नव्हती तिची. तिशीही उलटून गेली होती आता.

शेखर... दीप्तीचा बॉस. कामानिमित्त ब-याच वेळा एकत्र बाहेर गावी जाणे व्हायचे . अनेक दिवसापासून कुजबुज होतीच ....

" आत्ता चालते ग पूर्ती. कॉमन झाले आहे. लोखंडवाला कॉम्प्लेक्स मध्ये भाड्याने जे लोक रहातात त्यात ४० % असलीच जोडपी आहेत. आणि नंतर करतील लग्न"..मी

. "कसे करणार ? बायको आहे त्याला, मुलगा आहे. १२ वर्षाचा . तिला सोडायची त्याची तयारी नाही . तो म्हणतो , तिला सांभाळणे माझे कर्तव्य आहे ... आता कुठे जाईल ती ? "

हा मात्र मलाच शॉक होता.

" प्रियाताई, तू बोल न तिच्याशी. तिला आवडतेस तू. बघ ऐकते का ?"

माझे मन ३० वर्षे मागे गेले. आमच्या गावात खोतांची दोन घरे होती. एक त्याच्या घरापासून थोडे लांब. ती रहायची तिथे. भावीण. पण आता त्यांचीच. मुले ही होती तिला त्याच्यापासून . सुंदर होती दिसायला. अगदी लक्ष्मी..!!!. खोतांची बायको तिला गौरीला बोलवायची. ओटी भरायची. अखंड सौभाग्यवती ती. देवदासी. अर्थात गावात अशी प्रकरणे होती. त्यात कोणालाच वावगे वाटायचे नाही. हळदी कुंकूवाला मी आजीबरोबर जायचे. मला गाणी म्हणायला सांगायची. तिच्या घरी छान शिसवी लाकडाचा झोपाळा होता. मला त्याचे भारी आकर्षण. कधीतरी संध्याकाळी दिसायची ती, खोतांबरोबर...

कुंदकळ्या सारखे दात तिचे. हसताना खोतच काय, माझाही जीव अडकायचा त्यात. पण आजीचा राग होता तिच्यावर. मी गेलेले तिला अजिबात आवडायचे नाही.

“तिची काय चूक आहे गं अम्मा ? “

“आपल्या शेजेवरून रात्री घराबाहेर जाणा-या नव-याच्या बायकोचे दुःख तुला नाही गं कळणार. आहेस तू”…

आणि दिवस उजाडण्या पूर्वी शेज सोडून जाणा-या प्रियकराच्या प्रेयसीचे काय? तिला नसेल त्रास होत ? वाटत नसेल साधा, सामान्य संसार असावा...? साध्या सत्यनारायणाच्या पूजेला तिला त्याचा हात धरून बसता येत नाही. दिवेलागणीच्या वेळेला चोरासारखा येतो आणि पहाटे निघून जातो. मुले घरी बाबा मानतात पण बोलायची चोरी. बायकोचे आणि तिचे आयुष्य दिवस आणि रात्रीत विभागले आहे त्याने... आणि स्वतः मात्र हवा तसा दिवस आणि हवी तशी रात्र रंगवतोय. आज ३ दशकं लोटली. काळ बदलला...पण खरच बदलला... ?

“मला तुम्ही त्या भाविणीच्या पंक्तीत बसवता का ? त्या पैशासाठी शरीर विकायच्या.” दीप्ती भडकली होती...

“नाही... ती व्यवहारी होती आणि तो ही. म्हणून तर त्याने करार केला न ...अन्न, वस्त्र व निवारा आणि शय्या सोबत. मला गरज नाहीए त्याची; आमचे प्रेम आहे एकमेकांवर, त्याला जबाबदारीची जाणीव आहे...आणि म्हणूनच...जबाबदारीची जाणीव ? अन्न, वस्त्र आणि निवारा... बायकोची फक्त एवढीच जबाबदारी असते ? सात पावले चालणे याचा अर्थ तिला तिने त्याच्या मागे फरफटत जाणे असा असतो का ? तन, मन आणि धनाची बांधिलकी असते त्यात. त्याला नात्याची जाणीव असती तर तुला या फंदात पाडले नसते. आवरले असते मन त्याने...बायकोचा, तिच्या बरोबरील नात्याचा मान ठेवला असता. त्याला माहित आहे बायको सोडायची काय किंमत मोजावी लागेल! ती काय ठेवलेली आहे, हवे तेव्हा सोडून जायला ? कोर्टाच्या पाय-या चढायच्या नाहीत. पोटगी द्यावी लागेल. शिवाय मुलाचा हक्क. घराचे तुकडे. आर्थिक, सामाजिक नुकसान....

“आणि तुझ्यावर प्रेम असते नं तर त्याने एक निर्णय घेतला असता. प्रेमासाठी राज्य सोडले आहे लोकांनी. तो काहीही म्हणो, कायद्याच्या नजरेत कितीही शिकूनही तुझा

दर्जा रखेलीचा.... कायदा सोड, त्याची पर्वा नाहीच आहे तुम्हाला ... पण देवळात ही पूजेला नाही बसता येणार. त्याचे लोकहि नाही स्वीकारणार तुला आणि समाजहि नाही ....तुझ्यावर प्रेम आहे नं ? मग असे जीणे का देतो आहे तुला? जिवंतपणी जावूदेच, उद्या मेला तरी त्याचे शरीर नाही तुझ्या ताब्यात देणार ... हक्क राहील त्याच्याच लग्नाच्या बायकोचा...!! तळ्यात आणि मळ्यात.... दोन्ही दरवाजे उघडे ठेवले आहेत त्यांने स्वतासाठी."

निघून गेली भडकून... मी नाही थांबवले .

दुष्यंताची जात ही... नाही बदलणार. तेव्हाही शकुंतला फसली होती आणि आताही ...नावे वेगळी. समाजाने नाती निर्माण केली आहेत अंकुश ठेवायला. पुरुषाला मुलगा, पती, वडील या नात्यात बांधले तरच राहतो तो... नाहीतर देवाला सोडलेला वळू. कुठे जाइल कळणार नाही... अर्थात हे बंधन आत्ता स्त्रीलाही लागू आहेच. "companionship" केवढा गोड शब्द आहे आणि फसवा...! मानली तर जबाबदारी ......नाहीतर....!!!!!!!! पूर्वी हे संबंध सर्रास दिसायचे. तेव्हा दोन्ही बायका सहन करायच्या. त्यांच्या आयुष्याचा एक भागच होता. आणि आर्थिक स्वातंत्र्य दोघीनाही नव्हते. पण आताची मुलगी रखेल हा शब्द पचवू शकेल का ? आणि किती जणांची तोंडे बंद ठेवणार ? शिवाय मुलाचे काय ? त्यांनी जन्म घेतला तर त्याचा पालक म्हणून मिरवत येईल का ? त्याच्यावर अन्याय नाही ? असंख्य प्रश्न ...

खूप दिवसांनी पूर्ती आली.

"ताई , दीप्ती अमेरिकेला कायमची गेली "

"अरे मस्तच, बरे झाले, शेवटी शेखरने निर्णय घेतला तर...!! अमेरिकेत व्यक्ती स्वातंत्र्य आहे, नव्याने आयुष्य सुरु करायला संधीही मिळेल.

"नाही ग... एकटीच गेली. मध्ये शेखरचे अपेंडिक्सचे इमर्जन्सी ऑपरेशन करावे लागले. तिनेच नेले हॉस्पिटल मध्ये. पण फॉर्म वर सही घेताना मैत्रिणीची सही कशी घेणार ? बायको असताना ? आणि ती आलीही. तिचीच सही, तीच बसली होती... शेखर ही काही बोलला नाही...."... .

“ हं ....। पण बरे झाले. पूर्ण वाटोळे होण्याच्या आत सुटली. शेखर परत गेला का ?”

“हो, त्याच्या बायकोला नाही म्हणता कसे येईल ? तोंड दाबून बुक्याचा मार ... “

दुस-या स्त्रीची व्यथा जुनी आहे, अगदी तुळशीपासून... तिला सुद्धा विष्णूबरोबरचा आपला संबध समाजमान्य करून घेण्यासाठी प्रत्येक वर्षी त्याच्याबरोबर लग्नाला उभे राहावे लागते आणि तरीही तिचे स्थान घरात नाही... अंगणातच तिचे अस्तित्व आहे.

पण लक्ष्मीही सुखी असेल का ? जरी मंगळसूत्र मिरवत असेल तरीही आपला पती आपला नाही याची खंत नसेल का तिला ? तिने आपले सर्वस्व ओतले आहे त्याच्या पायावर.... पण तो फक्त तिचा नाही.... कितीतरी बायकांची घरोघरी हीच गोष्ट असेल. आपले तन , मन आणि धनही या काळात त्या नव-याच्या पायावर वाहतात. ही फसवणूक कशा सहन करत असतील ? अरुणा ढेरे यांच्या लेखातील एक ओवी आठवते..

रखुमाई म्हणे, ‘देवा, जनीशी काय नाते ? पोरके पाखरू, राती वस्तीला आले होते’....

आहे ते नाते आहे...तझे जास्त प्रश्न नकोत. कदाचित ही वंचना सहन नाही झाली म्हणून विठोबाच्या मूळ मंदिरात रुक्मिणी शेजारी नाही. पुराणातल्या या कथा...ख-या असतील किंवा खोट्या, पण बरेच काही शिकवून जातात .... निदान धोक्याचा कंदील तरी दाखवतात ... आताच्या लक्ष्मीला आणि तुळशीला ...!





मित्र – **स्मीता वैद्य - डोंबिवली**

तिने उत्सुकतेने कॉम्प्युटर चालू केला. फेसबुक उघडले. आणि ती एकेकाच्या पोस्ट्स वाचू लागली. कुणी कुणी काय काय लिहिले होते. फोटो, गाणी, काहींनी आपल्या मनातले विचार व्यक्त केले होते. त्याला कॉमेंट्स आणि लाइक्स येत होते. तिनेही काही कॉमेंट्स केल्या. तिच्या मैत्रिणीने तिला फेसबुक अकौंट उघडून दिले होते. हे सर्व तिला नवीन होते. तिला खूपच गम्मत वाटत होती. आपल्या विचारांची, आपल्या सारख्याच आवडी-निवडी असणारी माणसे इथे भेटतात. एकदा तिनेही एक फुलाचा फोटो शेअर केला तर त्याला किती लाइक्स आणि कॉम्मेंट्स आले. एकदा तिने गुड मॉर्निंग लिहिले तर किती तरी लोकांनी तिला गुड मॉर्निंग म्हटले. तिला नवीन फ्रेंड रिक्वेस्ट आल्या होत्या. तिने पाहिल्या.....ब-या वाटल्या त्या स्वीकारल्या, बाकीच्या डिलीट केल्या. काहीजण पुरुष मित्र उगाच मेसेज मधून हाय, हेलो करत असत. ती त्यांना फारसा प्रतिसाद देत नसे. तिला भीती वाटत असे..उगाच कशाला कुणाशी बोलायचं. कोण, कुठली माणसे असतात कुणास ठाऊक.

तिने आपल्या प्रोफ़ाइलवर एक छानसा फोटो लावला होता. स्वतःचा फोटो लावायला ती घाबरत होती. एक दिवस नेहमीप्रमाणे फेसबुक उघडले..तर तिच्यासाठी एक मेसेज होता. तिने पहिला..कुणी सचिन वर्तक नावाचा माणूस होता. त्याने तिला गुड मॉर्निंग म्हटले होते. तिने ही सहजच प्रतिसाद म्हणून गुड मॉर्निंग म्हटले. तर लगेच पुन्हा प्रश्न आला...कशा आहात मॅडम? ती जरा दचकलीच...पण तिच्याही नकळत ..छान आहे....असे उत्तर तिने दिले. मग अजून काही वेळ गप्पा चालू राहिल्या. परत संध्याकाळी ती ऑनलाइन आली. तिने एका पोस्त ला लाइक केले...तर लगेच त्याचा मेसेज...good evening madam .....!!

अरेच्या...आत्ता पण हा आहे..तिने विचारले...'तुम्ही कसे आत्ता??'
'जश्या तुम्ही तसा मी'..लगेच उत्तर आले.

ती मनापासून हसली. पुन्हा गप्पा सुरु झाल्या. साध्याच..जेवण झाले का?? घरी कोण कोण असते इत्यादी. दुस-या दिवशी तिने कॉम्प्युटर चालू केला. आता तिला उत्सुकता होती...असेल तो??? आणि तो होताच!! आता ती अधीर होऊ लागली. कधी एकदा कामे संपतात आणि ऑनलाइन येते असे तिला होत असे. मग रोजच गप्पा होऊ लागल्या. एक दिवस त्याने विचारले...

'मी तुम्हाला 'तू' म्हटले तर चालेल का??

ती क्षणभर सावध झाली..पण लगेच चालेल म्हणाली.

एक दिवस.. तो : तुझा फोटो का लावत नाहीस?

ती : माझा फोटो कशाला??

तो : मी कुणाशी बोलतोय कळत नाही म्हणून...

ती : त्यात काय कळायचं? माझ नाव माहीत आहे तुम्हाला. मी कुठे राहते माहीत आहे. सगळी माहिती आहे माझ्याबद्दल..मग फोटो कशाला??

तो : आता लता मंगेशकर गाते हे कळत असते. पण लता मंगेशकर कशी दिसते नको का कळायला??

ती चिडली. तिने बोलणे बंद केले. उगाचच तिचे लक्ष त्याच्या फोटोकडे गेले. समुद्रकिना-यावर मावळतीचा सूर्य. सूर्याची लाली पाण्यावर आणि किनार्यावर पसरलेली. तो सूर्याकडे पाहत असलेला...थोडासा लालसर, थोडासा काळसर दिसणारा त्याचा फोटो....!! हम्म ....तिने मान उडवली. "तुझा फोटो तरी कुठे स्पष्ट दिसतोय??" आणि ती एकदम दचकली. त्याचा विचार तिने उडवून लावला. ' मी नाही लावणार माझा फोटो.' ती स्वतःशी मनातल्या मनात ठामपणे म्हणाली. आता तिच्या डोक्यात सारखा तोच विचार. लावायचा का आपला फोटो?? शी......पण माझा एकही चांगला फोटो नाहीये. तिने कॉम्प्युटर उघडला तेव्हा प्रथम ती त्यात असलेले तिचे फोटो पाहू लागली. अनेक फोटो होते. पण कुठलाच तिच्या पसंतीस येईना.एक ड्रेस मधला फोटो तिला खूप आवडला. सुंदर फोटो होता तो.' पण छे ....हा नको....' ती स्वतःवरच नाराज होती. मग तिने एक साडीतला साधासा फोटो निवडला. तिने आपले प्रोफ़ाइल पिक्चर म्हणून हा फोटो लावला आणि...लगेच त्याचा मेसेज...

.'देवीचे दर्शन झाले....धन्यवाद!!'

ती खुदकन हसली. तिने गोड हसणारी एक स्माइली टाकली. पुन्हा गप्पा सुरु झाल्या. कुठला फोटो?? कधी काढला?? तू किती छान दिसतेस....तो म्हणाला. त्याने हळूच सुचवले...तू ही मला 'तुम्ही' न म्हणता 'तू' म्हटलेस तरी चालेल. ती शहारली.... मोहरली... घाबरली.... काय करतेय मी? चूक की बरोबर?? कसा असेल तो माणूस?? चांगला तर असेल ना?? पण बोलण्यावरून तरी सभ्य वाटतो. बरोबरच आहे त्याचं...मैत्रीत एकमेकांना एकेरी नावाने हाक मारायला काय हरकत आहे? त्यामुळे मैत्रीत अधिक मोकळेपणा येतो. मनात जर आदर असेल तर एकेरी उल्लेख सुद्धा खटकत नाही. छान दिसतेस म्हणाला तो...त्यात काय एवढं?? सहज प्रतिक्रिया होती ती!! आमची फक्त मैत्री आहे. अजून काही नाही. तिला याची पक्की खात्री होती. त्यांची मैत्री दृढ होत गेली. एकमेकांच्या आवडी, निवडी सांगता सांगता ते एकमेकांच्या समस्या सुद्धा शेअर करू लागले. त्याच्याशी बोलल्यामुळे तिला खूप मोकळे मोकळे वाटू लागले. ती दिवसभर प्रसन्न राहू लागली. एक दिवस त्याने त्याचा मोबाइल नंबर तिला दिला. तिने ही तिचा नंबर दिला. कधी “ ची देवाणघेवाण होऊ लागली. एक दिवस फोन वर बोलणे झाले. ती खूपच खूश होती. त्याच्या बोलण्याचा विचार करत होती. कसा होता त्याचा आवाज...त्याचे बोलणे..त्याचे हसणे....!! तो सुद्धा असाच विचार करत असेल का??

"मी मुंबईला काही कामानिमित्त येतोय. आपण भेटू शकतो का??"

ती विचारात पडली. भेटायचे कसे?? फेसबुकवर बोलणे ठीक आहे. प्रत्यक्ष भेटायचे म्हणजे..कोणी ओळखीचे भेटले तर.. कसे वाटेल? तिला फारच अवघड वाटू लागले. पण ओळख इतकी वाढली होती..तिला नाही म्हणवेना..शिवाय तिलाही त्याला भेटावेसे वाटत होतेच. त्याच्याशी इतके बोलणे झाले होते की तो परका वाटतच नव्हता.

झाले. भेटीची वेळ, जागा ठरली. तो सकाळीच आठ वाजता येणार होता. तिथून त्याला लगेच त्याच्या कामाला जायचे होते. ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी, ठरलेल्या जागी ती गेली. तो ही आलाच होता. त्याने हस्तांदोलन करण्यासाठी हात पुढे केला..हेलो...! तिने आपला आखडलेला हात पुढे केला. ती त्याच्याकडे बघत होती. कसा होता तो! खूप उंच, काळा, त्याला मिशी होती, थोडं पोट सुटले होते. तो ही थोडं संकोचल्यासारखा वाटत होता.

"आपण बसुया का इथे?" ते दोघे एका बाकावर बसले.

तो तिच्यापासून थोडे अंतर ठेवून सावकाश बसला. तिच्या डोक्यात मात्र तेच तेच विचार उसळी मारून वर येत होते. कसा आहे हा?? कसा दिसतो??याचे नाक जर जास्तच मोठे आहे. आपल्याला काहीच कल्पना नाही. कसे आलो आपण इथे? कोणी ओळखीचे भेटले तर काय म्हणेल?? तिचे अवघडलेपण जात नव्हते. मग एकदम त्याचा सभ्यपणा तिला जाणवला. तो अतिशय मोजके, तिच्याशी आदराने ,सौजन्याने बोलत होता. त्याची टापटीप, व्यवस्थितपणा तिच्या लक्षात आला, त्याच्या बोलण्यातून तिला नेहमीचा तो दिसू लागला, आणि एकदम तिचे अवघडलेपण नाहीसे झाले.

तो म्हणाला..'आपण चहा घेऊया का?? मी चहा न घेताच आलो आहे.'

तिला अतिशय आश्चर्य वाटले.

तो म्हणाला...'सकाळी लॉजवाल्याने चहा लवकर आणलाच नाही. मग उशीर होईल म्हणून तसाच निघालो.'

'तुला घरी बोलावले असते तर...चहा दिला असता ना...पण घरच्यांना आवडेल कि नाही..म्हणून....'

'हरकत नाही....आपण इथे चहा घेऊ शकतो.'

मग एका छोट्याशा टपरीवजा हॉटेलमध्ये त्यांनी चहा घेतला. मग इकडच्या तिकडच्या गप्पा सुरु झाल्या. एकमेकांच्या व्यवसायाबद्दल, फेसबुक मित्र-मैत्रिणी, फेसबुकवरील पोस्ट. तो बोलता बोलता पुन्हा म्हणाला...तू खरंच छान दिसतेस...ती फक्त हसली. तो म्हणाला....'मला जावे लागेल. कामाच्या ठिकाणी वेळेवर पोचायचे आहे.' त्याने हसून हात पुढे केला..या वेळी तिने हात आखडता घेतला नाही.

'भेटू परत.' तो म्हणाला. त्याच्या पाठमो-या आकृतीकडे ती पाहत राहिली. तिला खरंच एक चांगला मित्र भेटला होता !!



मला बायको हवी - सुनिला शिरूर-कांदिवली, मुंबई

निलीमाला गाढ झोपेतून अचानकच जाग आली. डोळे किलकिले करून तिने आजूबाजूला पाहिले. प्रथम तिला कळेच ना , की आपण कुठे आहोत ते. मग हळू हळू तिला आठवले, की ती तिची मैत्रीण गौरीच्या घरी आहे. तिच्या बेडरूम मध्ये झोपली आहे. प्रशस्तबेड, त्यावर स्वछ धुतलेल्या, चापून चोपून घातलेल्या चादरी आणि उशा, पायाशी पांघरूण, खिडकीचे हिरवे पडदे सारून रूम मध्ये दिवसा देखील दाट काळोख केलेला, पंखा मंद लयीत फिरत असलेला, आणि रूम भर सुखद गारवा. उशाशी ठेवलेल्या मोगरीच्या फुलांचा मंद दरवळ, उशाजवळ तांब्या भांडे, त्यात वाळा घातलेले गारपाणी. छानशी वामकुक्षी उरकून ती प्रसन्नपणे उठली. थकवा होताच, पण फ्रेश होवून हॉल मध्ये आली. तेव्हा तिचे पती आणि गौरी गप्पा मारीत बसले होते. “झाली का गं झोप ?" गौरीने हसत विचारले, "आत्ताच आले बघ मनोहर! बसा तुम्ही चहा टाकते" म्हणत गौरी उठलीच.

निलीमा घरी परतली तरी तिच्या डोळ्यासमोरून गौरीची हसमुख आणि प्रसन्न चटपटीत मूर्ती हलत नव्हती. गौरी काही तिची जुनी मैत्रीण नव्हे, नुकतीच त्यांची ओळख “TATA” च्या आवारात झालीहोती. गौरीचे पती धनंजय आणि निलिमा दोघेही पेशंट. धनंजयना आतड्याचा तर नीलिमाला घशाचा कन्सर होता. नीलिमा विलेपार्ले येथून तर गौरी दादर वरून टाटा मध्ये उपचारांसाठी येत असत; नेहमी नीलिमा सोबत मनोहर, तिचे पतीअसत, परंतु त्या दिवशी त्यांना ऑफिसला जाणे भाग होते. मग गौरीच म्हणाली , "त्यात काय तिला सोडून जा तुम्ही, मी आहे न! माझ्या घरी थांबेल. काम आटपून या आमच्या कडे, तेवढेच या निमित्ताने घरी याल". गरज होतीच, पण त्याही पेक्षा गौरीचे आर्जव मोडवेना. आणि ती तिच्या घरी गेली.

घर जवळच असले तरी गौरी स्वतः गाडी चालवून नव-याला घेऊन हॉस्पिटल मध्ये येत असे. मुंबई मध्ये मध्यवर्ती ठिकाणी असलेला दोन बेडरूमचा, आधुनिक सुखसोयींनी सजलेला गौरीचा प्रशस्त flat त्यांची उत्तम आर्थिक स्थिती दाखवीत होताच, पण त्याहूनही तो गौरी ही किती उत्तम गृहिणी आहे त्याचे द्योतक होता. एखाद्या न्हाऊ माखू घालून, तीट लावून,सजविलेल्या गो-या गोमट्या बाळासारखा तो flat दिसत होता. नव-याला हाताला धरून

घरात आणतानाच तिचे निलीमाकडेही नीट लक्ष होते. दोघांनाही हॉल मध्ये बसवून तिने लगेच ताटे मांडली. उन उन मुगाची मऊखिचडी, आणि अजिबात तिखट नसलेली गोड्स मटकीची उसळ! तिखट मसालेदार खाता येत नव्हतेच, पण पोटात ढवळून येत असल्यामुळे तिने खिचडी थोडीशीच पण चवीने पाण्याबरोबर घास चावत खाल्ली. धनंजयने मात्र अन्नाला नावे ठेवत नुसतेच अन्न चिवडले. पण गौरी चिडली नाही. “आजारपणामुळे चिडचिड होणे स्वाभाविक आहे, नाहीतर स्वभाव चांगला आहे त्यांचा" असे म्हणत तिने अन्न आवरून ठेवले. गौरीने आपली बायकी नजर सर्वत्र फिरवली. सारे काही जागच्या जागी स्वछ आणि नीट नेटके, धुळीचा कणही नाही. काचेचे dinning टेबल, देवूचा मोठा फ्रीज, micro, modular किचन, सारे काही होते. आणि ते सांभाळणारी समर्थ मालकीण घरात हजर होती. ठिकठिकाणी सुगंधी फुले, नीट आवरलेली कपाटे, घडी वर घडी रचलेले कपडे मुकाटपणे शिस्तीत कपाटात बसलेले, घवघवीत फुलांचा मोठा हार घातलेले, आणि निरांजन आणि उदबत्तीच्या सुवासाने घमघमलेले देवघर, दांडीवर वाळत घातलेले कपडे देखील किती रेखीव, प्रत्येक कपड्याची दोन्ही टोके नीट जुळलेली, सेंटरटेबल वर आजची मराठी आणि इंग्रजी वृत्तपत्रे मांडून ठेवलेली, दोन -चार मासिकेही उपलब्ध, काचेच्या showcase मधील वस्तू आजच न्हावून धुवून ठेवल्यासारख्या चकचकीत, तिच्या घरची बाथरूम, तिथे दरवळणारा फिनाइलचा सुवास, चकचकीत आरसे आणि स्वछ कमोड फारच छान! तिच्यातील गृहिणीने नकळत पसंतीची दाद दिली.

तिला आपले घर आठवले. one बेडरूम, हाल, किचनचा आटोपशील flat ! एकेकाळी तिनेही असाच सुंदर ठेवला होता. एकेक करीत सार्या वस्तू जमविल्या होत्या. घराची उब घरात शिरताच जाणवत होती. येथेच तिचा एकुलता एक मुलगा समीर लहानाचा मोठा झाला होता. आणि आता लग्न होवून तो पुण्याला स्थायिक झाला होता. आता ती आणि मनोहर दोघेच राहत असत. तिला तिच्या रोगाबद्दल समजले तो दिवस आठवला. पहिला धक्का ओसरल्यावर दोघांनीही एकत्र बसून नीट प्लानिंग केले होते. खर्चाचा अंदाज बांधला होता. ते फार श्रीमंत नसले, तरी हा जास्तीचा खर्च manage करू शकत होते. थोडी काटकसर करावी लागली असती. त्याला तिची ना नव्हतीच. तिच्यापाशी मनाची ताकद होती, फक्त शारीरिक ताकदी मध्ये ती कमी पडत असे. फार थकवा, ग्लानी येत असे. सकाळी लवकर उठता येत नसे. वेळेवर नाश्ता, जेवण बनविण्याचे वांदे होते . कधी omletपाव तर कधी bread buttar वर भागवावे लागत असे. मनोहरची कशालाही ना नव्हती. मशीनला कपडे लावणे इत्यादी बारीक सारीक कामे तो न कुरकुरता पार पाडी. पण प्रश्न सारे घरआवरण्याचा होता. दोन दिवसात धुळीचे साम्राज्य पसरे.

शिळी वर्तमानपत्रे टेबलसोडीत नसत. खरकटी भांडी बेसिन मध्ये तुंबत. बाथरूम धुण्याची वेळ निघून जाई.

जेव्हा तिला जरासे जरी बरे वाटले तरी ती फटाफट उठून कामाला लागे. सारेघर लख्ख करून टाकी. flower pot मध्ये नवीन ताजी फुले येत. नाश्त्याला गरमागरम पोहे, आणि वाफाळनारी कोफी असे. जेवणात खमंग पिठले किंवा बिरडे असे. पण मग चार दिवसानी पुन्हा तब्येत कोमेजत असे. फुलदाणीतील फुलांप्रमाणे! आणि माना टाकलेली फुले मालकिणीची वाट पाहत रहात. रोजच्या रोज नेमाने कामे होत नसत. आणि तिच्या आजारपणाची रया सारे घर पांघरीत असे. यावर उपाय काय? याचा ती रात्रंदिवस विचार करीत असे.

एखादी मोलकरीण ठेवावीका? मोलकरीण म्हणजे तिच्या कडून कामे करून घ्या, तिच्यावर लक्ष ठेवा, ती स्वयंपाक आपल्याला हवा तसा आणि हवा तेवढा करील याची काय शाश्वती? तेल तिखट जास्त टाकून चालणार नाही. पैशापरी पैसा जाऊन मनस्ताप पदरात पडणार?

सुनेकडे जावून राहावे का ? तिची सून खरच चांगली होती. अडीनडीला दोघेही रजा काढून येत. सून घरातली सारी कामे करीत असे. पण आपले घर सोडून या वयात दुसरीकडे जाणे फारसे रुचण्या सारखे नव्हते. शिवाय ती नोकरी करणारी, घरात झोपून राहणारी सासू तिला कितपत परवडेल हा प्रश्न होताच. शिवाय स्वतःच्या घरात कुणी विचारणारे नाही, बरे नसेल वाटत तर ती आठाठ वाजेपर्यंत झोपून राही. दुस-याच्या घरी असे थोडेच चालेल? तिने तो विचार झटकून टाकला. तिला एकदम आपल्या नसलेल्या आईची आठवण आली. लहानपणी जेव्हा बरे वाटत नसे, तेव्हा आईचा किती आधार वाटे. तिचा मायेचा हात डोक्यावरून फिरता क्षणीच आजार पळून जाई. " आई ग ये न्" तिने कळवळून म्हटले खरे, मग तिलाच आपल्या विचारांचे हसू आले.आज आई असती तर किती वर्षांची असती, आणि ती आपल्याला सांभाळू शकली असती का? किती स्वार्थी विचार करतो आपण! आपल्याला एखादी मुलगी हवी होती, आईवर जीव लावणारी! तीच मन हुरहूरलं. पण मुलगी किती काळ आपल्या घरी राहणार? ती गेलीअसती सासरी.उलट आपल्यावरच तिच्या बाळन्तपणाची जबाबदारी आली असती. पेलली असती का मला अशा अवस्थेत? पुन्हा नकार मनाचा! बहिण, नणंद,जाऊ,वहिनी सारेच नातलगतिला होते सारेच caring आणि हेल्पफुल परंतु स्वता:च्या जबाबदा-यापुढे त्यांना कुठली फुरसत आणि त्यांना दोष तरी कसा देणार ?

शेवटी संसारात अडीअडचणीला नवरा आणि बायकोच एकमेकाला मदत करणार. तिने नव-याची कितपत मदत होते याचा आढावा घेतला. मनोहरने सारे धीराने घेतले होते. तिला धीर देणे, आधार देणे, आर्थिक व्यवहार सांभाळणे, जरूर तेव्हा सोबत करणे, घरातील लहान सहान कामे करणे सारे तो बिनबोभाट करीत असे. खूप पैसा खर्च होतो असा तिचा तक्रारीच सूर असला की तो समजावी, "आपण पैसे कशासाठी कमावतो? जरुरीसाठीच ना ? मग जरूर म्हणून खर्च झाला, तर काय बिघडले ? उलट कामी आले असेच समजू ." जे समोर येईल ते विनातक्रार खाणे ही सुद्धा तिच्यासाठी मोठीच मेहेरबानी होती. घर नीट नेटके नसण्या मागची तिची मजबुरी तो समजून घेऊ शकत होता. पण तिची जागा घेणे त्याला शक्य नव्हते. शेवटी तो नवरा होता. आणि नवरा म्हणून ज्या अपेक्षा त्याच्याकडून होत्या त्यात तो पूर्णपणे उतरत होता.

मग असे काय होते; जे तिला आजारपणात हवे होते? ज्याची उणीव गौरीला पाहून तिला जाणवू लागली होती ?

तिला हवे होते मायेचे एक माणूस!.... जे आजारपणात तिच्या मागे खंबीरपणे उभे राहील, तिच्या घरची काळजी घेईल, हसत मुख, मायाळू, गरमागरम जेवण करून घालणारी, वेळेवर औषधे देणारी, सारी आजारपणाची कागदपत्रे व्यस्वस्थित लाऊन ठेवणारी, गौरीसारखी एक आदर्श पत्नी...! Yes, तिला एक पत्नी हवी होती..!!.. आजारपणात तिची सेवा करणारी..!!!

आपल्याच विचारांचे तिला प्रचंड हसू आले. "देवा पुढच्या जन्मी आजार देणारच असशील तर मला पुरुष कर म्हणजे मला छानशी पत्नी मिळेल" विचार करताकरता तिला ग्लानी आली परंतु झोपेतही डोळ्यापुढे एक चेहरा नसलेली स्त्री तिच्या घरभर वावरत होती, तिची छाया बनून....!

तिच्या करीता झिजत आणि तिच्या घराची काळजी घेत..!!.

'टिचकी मारुनी जावे' - *सौ. शालिनी कुलकर्णी, १९२, शंकरनगर, नागपूर*

माझ्या लहानपणी म्हणजे ७० वर्षापूर्वी, आम्ही शाळकरी किंवा आजूबाजूच्या मैत्रीणी खूप वेगवेगळे खेळ खेळत असू. सर्व खेळ, बिनखर्चाचेच असायचे ३-४ मैत्रीणी असल्या तर टिक्कर बिल्ला (त्यात टिक्कर म्हणुन कौलाचे चपटे) तुकडे, खेळायचो, कधी सागरगोटे, चपेटे, लपाछपी, सोटापाणी, उभा खो-खो, डाबडुबली, दोरीवरच्या उडया, झिम्मा, वेगवेगळया फुगडया, कधी अंगणात आपोआप आलेल्या मोठया झेडूंच्या फुलांनी वहयांच्या पृष्ठांवर बॅडमिंटन् असे विविध खेळ खेळून करमणूक करीत असू, पत्ते, कॅरम हे खेळ तेव्हा परवडत नसत म्हणून कुणाकडेच नसायचे. पण तेव्हा बोअर व्हायला अभ्यास, शाळा, घरकाम, खेळण, देवळात जाणं हया कामामधे जागाच नसायची. खेळून आलो की आई, तसराळयात (पितळीबेसीन सारखे भांडे) गरम पाणी, क्वचित तेल वा लोण्याची बेरी घालून पाय शेकायला सांगायची. पाय पुसून देवाजवळ शुभंकरोती, रामरक्षा नंतर २० पर्यंत पाढे वगैरे म्हणत असू. नंतर जेवण व झोप. होमवर्क फार नसायचेच. शाळेतच करून टाकयचो. एखादे वेळी निबंध लिहून न्यायचा असला की मोठया बहिणीच्या मदतीने लिहून न्यायचो. मला आठवतय ५ वी त असताना माझ्या आवडीचे पुस्तक हया कठीण विषयावर निबंध लिहायचा होता.

मोठया बहिणीने नुकतीच १० वी ची परिक्षा पास केली होती. तिने निबंध लिहून दिला, श्री. फडक्यांची दौलत ही कादंबरी फार आवडते. आमच्या बुध्दिला हे माहित नसूनही शिक्षिकेने चांगला असा शेरा दिल्याचे आठवतेय. सगळी मज्जाच !!

आता तर ते जुने खेळ नामशेषच झालेत. त्यांची नावेही नीट आठवत नाहीत. काळानुसार नवनवीन खेळ निघालेत, हळूहळू टि.व्ही, रेडियो हयांनी करमणुकीची जागा घेतली. नाचगाणी, नाटके, सिनेमा,गप्पा हीच करमणूक झाली. बोअर व्हायला लागते. मग संस्कारशिबीरे, गायन शाळा, नृत्यशाळा हयांचे वर्ग सुरू झालेत. हळुहळु योगासनाला महत्व यायला लागलं. त्याचे पण वर्ग सूरू झालेत.

परवा आम्ही २-३ दिवस एका मैत्रीणीकडे सहल म्हणून खेडयावर गेलो होतो. बैलगाडी, शेणाच्या गोव-या बाजुला तुराटीचे प-हारीचे ढिगारे, झोपाळा, सडा-रांगोळी घातलेले प्रशस्त अंगणात तुळशीचे वृंदावन, जेवायला बसवण्यापूर्वी पायरीवर पाय धुवायला गरम पाणी एका घंगाळात ठेवलेले, जवळच लख्ख पितळी लोटा, पंचा (टौवेल) सर्व सज्ज.

जेवायला बसायला लाकडी नक्षीदार पाट, ताट ठेवायला गोल पाट, त्यावर पितळी फुले खिळयांनी ठोकलेली होती.

मस्त गरमागरम भाकरी, वाटीत लोणी, जवसाची, लसणाची, तिळाची अशा तीन चटण्या,तिखट, आंबा लोणचं, वांग्याच भरीत, घट्ट दही हे सर्व पाहून प्रत्येकीच्या तोंडाला पाणी सुटलं होतं. खूप म्हणजे खूपच जेवलो. अगदी हावरटासारखं. गप्पा करत पांढ-या स्वच्छ चादरी घातलेल्या बिछान्यावर पहुडलो. निद्रेच्या केव्हा आधीन झालोत, कळलंच नाही.

तेवढयात माझ्या कानांवर शब्द ऐकू आले. शेवंताने यावे, ’टिचकी मारूनी जावे’. ताडकन् उठले. मैत्रीणीच्या शेजारच्या घरी, अंगणात ५-६ मुलींचा टिचकी मारूनी जावे खेळ रंगला होता. कुणी परकरपोलका, कुणी झगा घातलेल्या होत्या. त्यांचा खेळ पाहतापाहता परकर पोलक्यातली मीच तेथे खेळू लागले. कुणीतरी माझे डोळे झाकले. समोरील मुलींपैकी एकीला मोठया मुलीने म्हटले, गुलाबाने यावे, टिचकी मारूनी जावे. अळीमिळी गुपचिळी. कुणी शेवंता, कुणी कमळा, कुणी मोगरा अशी नावे ठेवली होती. जिचं ठरवलेले नाव घेतलं की तिने माझ्या कपाळावर टिचकी मारून जायचे व चूपचाप न हलता निर्विकार चेह-याने ओळीत जावून बसायचे. माझे डोळे पट्टीने झाकलेले, मोकळे करायचे, थोडा वेळ अंधारी गेली अन मी पाहिले. ही ‘१ ल्या नंबरची’, ‘नाही‘, ‘३-या नंबरची’ ‘नाही’ कपाळ टिचक्या मारून मारून नाव ओळखूच आले नाही. २ वेळाच ओळखायची संधी होती. मला नाव ओळखूच आले नाही. कपाळ टिचक्या मारून दुखू लागले होते. पण मी काही मारणारीला ओळखू शकले नाही.

हात कपाळावर गेला, कुंकवाची टिकली जागेवरच होती. बाकी सगळया ब-या ढाराढूर झोपल्या होत्या. मी ही झोपलेलेच होते. स्वप्नच पडलं बहुधा. मला हसू आलं, लहानपणी टिचकी मारणारीला मी ओळखू शकत नसे. नकळत मी माझ्या आत्ताच्या म्हातारपणाच्या आयुष्यात गेले.

अळीमिळी गुपचिळी असं वागणं आत्ताही माझ्या मनावर टिचक्या मारून जाणा-यांना छान जमत. प्रयत्न करूनही ती व्यक्ती मला ओळखू येत नाही. हया आत्तापर्यंतच्या माझ्या आयुष्यात किती वेगवेगळया प्रवृत्तीच्या व्यक्तींनी माझ्या मनावर टिचक्या मारून चुपचाप बसण्याचे मंत्र साधले होते. मग ती व्यक्ति 'सासू' म्हणून येते, कधी जावई, कधी नणंद, कधी जाऊ, कधी वहिनी, कधी बहिण अन कधी ती व्यक्ति नवरा हया नावाने पण येते.

कधी भाजीवाली, कधी घरचा नोकर, कधी ड्रायव्हर कधी धोबी, कधी शिंपी अशी वेगवेगळी नांवे धारण करून मला टिचक्या मारून हया व्यक्ति साळसूदपणे वावरत असतात. लहानपणी, आईला, कपाळावरचा हिरवानिळा डाग दिसू नाही म्हणून लपून तेलाचे बोट कपाळावर चोळत असे. डाग १-२ दिवसात जायचा.

पण आता घरात सतरा प्रकारचे मलम, क्रीम, तेल, पावडरी आहेत. पण मनावरच्या हया टिचक्यांचे वळ काही जात नाहीत.

पण आता मला सोपा उपाय सापडलाय. बहुधा माझ्या वयाचा परिणाम असेल. कुणी कितीही टिचक्या माझ्या मनावर मारून गेले तर त्यांच्या ऐवजी मीच 'अळीमिळी गुपचिळी' हे तंत्र वापरायचे. काही झालं तरी आपलं हे सुंदर, सोप साधं आयुष्य, कशासाठी खराब करायचं ? हे सुंदर, साधं, सोप्या पध्दतीनंच जगायचं, हसावसं वाटलं हयासचं, रडावसं वाटलं रडायचं. पण हे सुंदर, साधं, सोपं, आयुष्य वाया घालवायचं नाही.



मग माझे घर कुठे आहे...? - *मीना त्रिवेदी - मुलुंड*

वसुधा तिशीतली असेल. तिला दोन मुलगे होते सोन्या सारखे. एक ४ वर्षाचा, एक दीड वर्षांचा. घरात ती, नवरा, एक विधवा आते सासू नि तिची मुलं.. असा हा संसार ! ..किंतू करण्या सारखे काही नव्हते, पण वसुधा नेहमी घाबरलेली, बावरलेली असे. तिला वाटे तिची आते सासू तिच्या वर सतत पाळत ठेवून असते. सुचनांचा पट्टा सतत चालू.. पापडांना ऊन दाखव, कारल्याची भाजी विनोदला आवडत नाही, दुसरी कर.. मुलाला सर्दी झाली आहे, ओवा शेकून छातीला लाव, एक न दोन. सारे नव-याच्या मर्जीनुसार झाले पाहिजे व नव-याला काय आवडते, काय नाही आवडत, ह्याची मक्तेशाही त्या आते सासूची.

त्यातून दुसरा विनायक जन्मल्या नंतर, थोडा धीर करून, रोज संध्याकाळी शेजारच्या बागेत मुलांना बाबागाडीत बसवून मोकळेपण जरा मनात भरून घ्यायची. .. काही तिच्यासारख्या आया व त्यांच्या मुलां बरोबर दृष्टीभेट, ओळख होऊन, हास्य-स्मित देवाण घेवाण होत असे. तिथे एक २०-२२ वर्षांची एक तरुणी 'मित्रा' पण रोज भेटायची. तिच्या मुलांशी खेळायची. दिसल्या बरोबर तिच्या चेह-यावर हसू भरभरून ओसंडायचे.. जवळ आली की विविध विषयांवर गप्पा सुरु. साधारण एकमेकींची माहिती देवाणघेवाण झाली होती. घर, घरात कोण वगैरे. वसुधाला ती आवडायची. तिच्या डोळ्यांतून ती जगाला बघण्याचा प्रयत्न करू पाहयची.

दोन दिवस मोठ्या मुलाला बरे नसल्याने ती बागेत जाऊ शकली नाही. दुसर-या दिवशी संध्याकाळी तिला मित्राची आठवण येत होती.. तेवढ्यात बेल वाजली. दार उघडले तर समोर मित्राच...!. वसुधाच्या चेहे-यावर स्मित झळकले पण बुचकळ्यात पडली. पुढे काय करायचे..! तितक्यात आतेसासूबाईंनी हाक मारली. कोण गं ? वसुधा आणिकच बावचळली.

काही बोलायच्या आत मित्रा दारातून आत आली. तिच्या हातात सुटकेस होती. ती म्हणाली 'वसुधा ताई मला आत येऊ तर दे'. दोन दिवस दिसली नाहीस. मला बरंच सांगायचं आहे ..थोडा प्रोब्लेमच आहे. मग म्हंटलं तुझ्याकडे राहून काय रस्ता काढता येतो ते बघावे.' आतेसासू

कानाने थोड्या कमी ऐकायच्या ते बरे, असं वसुधाला वाटून गेलं. सासुबाईंना काय सांगायचं हा विचार करत होती वसुधा. तेवढ्यात मित्रानीच आपली ओळख करून दिली. मुलांना बघून त्यांच्याशी खेळायला लागली.

कसाबसा स्वयंपाक आटोपून वसुधा मित्राला दुस-या खोलीत घेऊन गेली. मित्रा म्हणाली, की ती घर सोडून आली आहे. थोडे दिवस इथेच रहायचा विचार आहे. तिचे लग्न तिला पसंत नसलेल्या मुलाशी करून टाकायचे असे घरच्यांनी ठरवले म्हणून. तिला अजून लग्न करायची इच्छा नाही व थोडे शिक्षण व व्यवसाय करावा असा तिचा मनसुबा आहे.. वगैरे..

वसुधाला मोठे संकट कोसळल्याचा अनुभव होत होता.

टेबलावर जेवताना तिने गरम गरम फुलके केले, कोशिंबीर केली. टेबल तयार केले. हसतमुखपणे काही काही बोलत राहिली. वसुधाच्या नव-याने विचारल्यावर आपल्या बद्दल सारे सांगून मोकळी झाली. वसुधाच्या नव-याने गप्प राहून आपली नापसंती दर्शवली.

आपल्या खोलीत गेल्यावर वसुधाच्या नव-याने तिला फैलावर घेतले.. अशी कशी मैत्रीण .. अश्या लोकांशी मैत्री करतेस ..घरच्यांच्या इज्जत अब्रूची काही फिकीर नाही.. म्हणे शिक्षण करायचे आहे, व्यवसाय करायचा आहे.. मुलगा पसंत नाही.. उद्या सकाळी तिला घालव. . वसुधा अस्फुट आवाजात बोलली, “ती जाईल हो दोन तीन दिवसात.” एक मुस्कटात बसली..”मला विचारले होतेस? घर कुणाचे आहे?”

सकाळी दुध गरम करताना आतेसासू मागे येऊन म्हणू लागल्या, “तुला काही कळत कसे नाही.. अशी तरुण मैत्रीण नवर-या समोर जाणार नाही याची काळजी घ्याला हवी.. किती चंचल आहे” .. वसुधाने चहासाठी भांडे घेत घेत मागे बघितले, तर मित्रा मागेच होती. नाश्ता झाला.

वसुधा विचार करत राहिली. तिला आठवले विनोदचा एक मित्र , ...तरूण का काय नांव होत त्याचं ! असाच एके रात्री उगवला होता. आईबापांशी भांडून नोकरीबिकरी करायचीच नाही अस ठरवून. विनोदने त्याला चांगलीच मदत केली. व्यवसाय सुरु करून दिला. जम बसवण्यासाठी स्वतः लक्ष पुरवले. चांगला महिनाभर राहिला होता . त्याच सारं हवं नको

बघायची ताकीद केली होती विनोदने तिला.   येतो अधूनमधून .. बायकोला घेऊन.. लग्न ठरवायला पण विनोदच मध्यस्थी होता.   मग आज विनोद असा का वागला हे कोडंच पडलं .

तिला भरभरून रडावंस वाटत होतं. आणि काय काय आठवणी येत होत्या. मध्यंतरी चारेक महिन्या पूर्वी शेजारच्या शर्मिष्ठा वहिनी आल्या होत्या,   १५००/- रुपये तातडीने हवे होते.. मिळतील का म्हणून ?   दिसत होतं, की त्या खूप तणावग्रस्त होत्या. शर्मिष्ठा म्हणाली, “मला कारण विचारु नका आत्ता .. आत्ता पैसे द्या जमले तर.. मी हे उपकार कधीच विसरणार नाही”! वसुधाला काहीच उत्तर देता आले नाही.. तरी कशीबशी म्हणाली, “अहो वहिनी नाहीत हो इतके पैसे माझ्या जवळ. पण आज रात्री ह्यांना सांगते द्यायला.. पण कारण काय बरं सांगू?” असा प्रश्न विचारल्यावर तडक शर्मिष्ठा उठून निघून गेली.

रात्री जेवण खाण आटोपल्यावर तिने विनोदशी लाडीगौडी करुन पैशांबद्दल विचारले ' मला किनई थोडे पैसे हवेत.. १५०० रुपये.... देता?'

“'अरे वाह, राणीसाहेबांना पैसे हवेत का? मग घ्या की.. आधी द्या टॅक्स.. मग्” म्हणत त्याने पण संधीचा चांगलाच फायदा करून घेतला आणि मग वसुधाला विषय बोलताच आला नाही.

तिस-या दिवशी शामा- घरात काम करायला येते, ती तोंडाला पदर लावून कानाशी फुसफुसत म्हणाली, “ ऐकलत का.? बर भाग्य आहे तुमचं.. दोन्ही मुलगेच आहेत;   नाहीतर बघा, कशी परिस्थिती येउन उभी ठाकते मुलीच्या आईबापांवर... ती रसिका शर्मिष्ठाची पोर.. कोवळी ग बाय.. पंख्याला लटकून जीव दिला हो”. वसुधाच्या डोक्यात लख्खकन प्रकाश पडला आणि तिचा जिrव हळहळला.   आपण अश्या तातडीच्या प्रसंगाला कारण विचारत होतो,   असते आपल्याकडे १५०० रूपये तर..... ती पोर वाचली असती..

आणि रात्री हे जसंच्यातसं विनोदला सांगितलं. आपली हळहळ न लपवता. विनोद अंगावर धाऊनच आला.. “तुला ह्यासाठी पैसे हवे होते...? अशी काळी करतूतं करणारी मुलगी मेली तेच छान झालं”. वसुधा विचार कर करुन दमली होती. तिला इतक खजिल वाटलं आपलं असा संसार चालवणं. या संसारात आपली काय किंमत? आपण कशासाठी जगतो? 'माझ्याकडे कुणी अडचणीत मदत मागितली तर मी काही करू शकत नाही..... हे घर माझे नाही..... मग माझे घर कुठे आहे ?? मलाच असे प्रश्न पडत असतील?'..की इतर बायकांनाही पडत असतील.

“देव न करो नि मला कधी मदतीची गरज भासली तर.. ..?”



निरुत्तर – *अलका गांधी-असेरकर*

संध्या..!! अनिताची जवळची मैत्रिण. गाठीभेटी कमी व्हायच्या पण फोनवर बोलणं असायचं अधुनमधून.
एकमेकींकडच्या बातम्याही कळायच्या. शाळेत असल्यापासून जीवाभावाच्या मैत्रिणी... एकमेकींशी सारं काही शेअर करत असत.

दोघींची लग्नंही एकाच वर्षात झाली. एकमेकींच्या लग्नात जाता नाही आलं काही कारणाने. पण संध्याला छान स्थळ मिळालं होतं. नवरा व्यवसाय करत होता. धनाढ्य नाही म्हणता येणार पण सधन होता. नंतर तिला एक मुलगा तर अनिताला एक मुलगी झाली. दोघींचे संसार फुलत होते. आपापल्या संसारात दोघी मग्न होत्या, गुंतलेल्या होत्या. तरी कधीतरी संवाद घडत असे. भेटीही होत होत्या या ना त्या निमित्ताने.
अचानक संध्याच्या संसाराला दृष्ट लागल्यासारखं झालं. जराशा आजारात नवरा गेला. मुलगा तेव्हा फक्त आठ वर्षाचा. अनिता तिला भेटायला गेली तेव्हा अगदी पांढ-या साडीत बसलेली ती, अनिताला आवेगाने बिलगली. अश्रुंची धार दोघींच्याही डोळ्यांतून वाहू लागली. अपूर्व हा तिचा मुलगा. आठच वर्षांचा.. बावरलेला, पण समंजस वाटू लागला एकदम. मोठा झाल्यासारखा थोडा.
संध्या फक्त पस्तिशीची जेमतेम. देखणी, सुंदर बांधा असलेली, पस्तिशीत असली तरी पंचविशीतली वाटावी इतकी तरूण दिसत होती. पण दुःखाने झाकोळली होती.
काळ सर्वात मोठं मलम असतं म्हणतात. सा-याच दुःखावरचं. आणि दिवस काही थांबत नाहीत. ना सुखाचे, ना दुःखाचे..!! ते तर धावतच असतात. ते सुख किंवा दुःख दोन्ही भरभरून भोगायला उसंत देतातच कुठं. आपल्याला त्यांच्या सोबत ओढत राहतात.

पैशांची काळजी तिला फारशी नव्हती. नव-याने कमवलेलं सारं काही होतंच. त्यात मायलेकांचं व्यवस्थित होत होतं. संध्याच्या सासरची मंडळी सारी होती. पण ती तिच्याजवळ राहत नव्हती. येऊन जाऊन असत. अपूर्व हुशार होता. शाळेत प्रगती करत होता. संध्या तशी कडक स्वभावाची, रागीटच ! अपूर्व तिच्या जबर शिस्तीत वाढत होता. कधी कधी अनिता म्हणतही असे, "कशाला एवढं धारेवर ठेवतेस त्याला" ? इतका हुशार आहे. कळतं की त्याचं त्याला. जरा झाले लाड तरी काही बिघडायचा नाही तो लगेच. परंतु तिला ते पटत नसे. शाळेतल्या त्याच्या प्रगतीवर ती बारीक लक्ष ठेवून असे. त्याच्या खाण्यापिण्याच्या, शाळेच्या-ट्युशनच्या वेळा ती काटेकोर सांभाळत असे. त्याला कुणाच्याही भरवशावर सोडत नसे.

असा अजून पाचेक वर्षाचा काळ भुर्रकन उडून गेला. न् एकदा अनिताची बहीण रेखा अनिताला म्हणाली न् ते ऐकून ती अवाक् झाली. संध्याचं म्हणे तिच्याहून जवळपास आठ-दहा वर्षे लहान असलेल्या तरूणाशी अफेअर आहे. दोघांचे शारीरिक संबंध असावेत. परंतु त्यांनी लग्न मात्र केलेलं नाही.

अनिताला खूप आश्चर्य वाटलं. संध्याने असं का करावं. नवरा गेला तेव्हा अवघी पस्तिशीची होती. अनिताने देखील तिला दुस-या लग्नाबद्दल हलकेच छेडलं होतं. परंतु आपल्याला दुसरं लग्न करायचं नाही हे ती ठाम उत्तरली होती.

शिवाय आताचा काळ काही पूर्वीचा नव्हता. जर तिने ठरवलं असतं तर तिला दुस-या लग्नापासून कोणी अडवलं असतं असं वाटत नव्हतं. तिच्या सासरची मंडळीही ब-यापैकी आधुनिक विचारांची, समंजस होती. त्यामुळे अनिताला आश्चर्य वाटलं. आणि संध्याने असं का करावं. याचा मनात विचार येऊन रागही आला.

भेटली, की तिला विचारायचंच. हेही तिच्या मनाने जणु ठरवूनच टाकलं.

आणि तो योग आलाच लवकरच. अपूर्वच्याच मुंजीचं आमंत्रण होतं तिला. तो आठ वर्षांचा असतानाच त्याचे बाबा गेलेले. न् मग काही ना काही कारणांनी राहून गेलं होतं. साध्याच समारंभात मुंज करण्याचं तिने आयोजलं होतं. तशी ती खूप कर्मठ, धार्मिक

नव्हती. परंतु सारं नाकारणारीही नव्हती. चार लोकांप्रमाणे सारं करावं. कशाचाही बाऊ न करता. असा तिचा स्वभाव.

मुंज आटपली. न् तिने अनिताला राहण्याचा आग्रह केला. अनिताही तयारीनेच आली होती दोन दिवसाच्या. कारण संध्या अनिताच्या माहेरच्या गावीच राहत होती. तिला त्या निमित्ताने माहेरी आता कोणी नसलं, तरी राहून चार जुन्या लोकांच्या गाठीभेटी घ्यायच्या होत्या. शिवाय संध्याशी गप्पा मारून तिच्याविषयी ऐकलेल्या गोष्टींचा शहानिशा करण्याचा, अगदी हक्काने तिचा कान पिळण्याचा सुप्त हेतूही नव्हताच असं नाही. पण संधीच मिळाली नाही. आणि परतण्याचा दिवस उद्यावर येऊन ठेपला.
रात्री उशीरा, अनिता दुस-या एका मैत्रिणीकडून, रंजनाकडून जेवूनच आली. यायला दहाच वाजले. सकाळी निघाय़चं होतं. पण रंजनानेही संध्याबद्दल काढलेले सूचक उद्गार तिला अस्वस्थ करत होते. रंजनाच्या उद्गारांकडे फारसं लक्ष न देता तिने विषय वाढवला नव्हता. रंजनाच्याही ते लक्षात आलं असेल. तिनंही मग विषय बदलला होता. पण मनातून ते उद्गार अजून जात नव्हतेच.

अनिता संध्याच्या बंगलेवजा घराच्या पाय-या चढत असतानाच संध्या आतून बाहेर आली. म्हणाली, “माझंही जेवण आताच उरकलंय. अपूर्व त्याच्या बेडरूममध्ये झोपण्याच्या तयारीत आहे. तू दोन दिवस राहिलीस, पण आपल्याला बसून निवांत बोलताही आलेलं नाही. शिवाय किती वर्षांनी तू आलीस. पुन्हा केव्हा येशील कोण जाणे. चल गच्चीवर बसू या. जरा बोलत. आज चांदणंही छान पडलंय.”
गच्चीचा जिना बंगल्याच्या बाहेरच्या बाजूनेच होता. अनितालाही मनातून तेच हवं होतं. म्हणजे दोन्ही, चांदण्यात निवांत बसावंसंही वाटत होतंच, अन् संध्याशी बोलण्याची संधी. जी आयती वायती संध्यानेच देऊ केली होती. ती तिच्या मागोमाग गच्चीवर आली. खरंच ...टिपूर चांदणं पडलं होतं. मंद वारा वाहात होता. गच्चीच्या पार वरपर्यंत आलेलं प्राजक्ताचं झाड बहरलेलं होतं. फुलांचा मंद सुगंधही येत होता. गच्चीवर

सुरेखसा झोपाळाही होता. तिचं मन इतकं प्रसन्न झालं की वाटलं काहीच बोलू नये. विचारू नये. शांतपणे एकमेकींच्या सहवासात बसून राहावं झोके घेत.

तशा त्या बसल्याही. अन् संध्याने तिचा हात हातात घेतला. म्हणाली, “अनिता, काही बोलणार नाहीस का..?”

अनिताने तिच्याकडे फक्त अर्थपूर्ण नजरेने पाहिलं.

ती म्हणाली, “तू दोन दिवस इथं होतीस. मला माहितंय, नक्कीच तुला कोणीतरी काहीतरी माझ्याबद्दल बोललं असणार. आपण एकमेकींना चांगलं ओळखतो. रात्रंदिवस सोबत असायचो. अभ्यास, भटकणं, गाणी, सिनेमा, त्यावरच्या चर्चा...एकमेकींचे बोलके चेहरे आपण बरोबर ताडतो. न बोलताही. आणि तरीही अखंड बडबडतही असू... हो ना ? मग आज का गप्प ?”

अनिता ओशाळली. पटकन काय बोलावं ते सुचलंच नाही तिला. मग मात्र न राहवून अनावर होत तिने म्हटलं. “हो ना ?...संध्या ..मग तूच सांग ...हे का असं ...तुझ्याबद्दल ऐकतेय मी ?”...तिने तीव्र स्वरात विचारलं.

संध्या शांतच होती. आणि गंभीरही.

“मी काय करायला हवं होतं ?. अनिता.”

“लग्न..!. का नाही केलंस दुसरं लग्न ?”

“कशासाठी करायला हवं होतं मी ते ? माणसं लग्नं का करतात ? विशेषतः मुली का करतात ? सांगू शकशील ?”

‘का करतात म्हणजे ...अगं ...’

संध्याने अनिताला मध्येच तोडलं.

“मला चाकोरीतलं उत्तर नको. खरंतर आपल्या समाजात आपल्याला लग्नाला पर्याय ठेवलाय का ? आपल्याला ते करावंच लागतं..! विशेषतः मुलींना. आणि त्या वयात तेवढं कळतंही नसतं. ही रुढी, ही परंपरा म्हणजे कम्पल्सरीच जणू. जन्म-मृत्यु प्रमाणेच. इतकं गृहीत धरतो आपण लग्न या प्रकाराला. मीही केलं. छानसा मुलगा झाला.

अंबरीशचं माझ्यावर खूप प्रेम होतं. जेमतेम दहा वर्षाचं वैवाहीक आयुष्य. पण ते आम्ही भरभरून जगलो. आर्थिक विवंचना तेव्हाही नव्हती, आताहि नाही. आज तो नाही. परंतु मला कुठंही एकटेपणा फारसा वाटत नाही. माझा स्वभाव कुढत बसण्याचा नाही. मी आज अनेक सामाजिक मंडळांमध्ये कार्यरत आहे. दिवस कुठं उगवतो न् मावळतो ते समजतही नाही. शिवाय अपूर्वचं टाईमटेबल बघावंच लागतं. अपूर्व हा माझ्या काळजाचा तुकडा आहे. त्याचं आयुष्य छान जावं. त्याने प्रगती करावी असं मला वाटतं.

“मग”.....अनिताने प्रश्नार्थक नजरेने जणू पाहिलं......!

“हो...दिवस कुठं जातो ते समजत नाही. पण रात्र येतेच ना अनेकदा अंगावर. ती एकटीने कशी काढायची अनिता. माझ्या रंध्रारंध्रातून जागं करते ती मला. उत्तेजित करते.”

“म्हणूनच.. लग्न हा पर्याय नाहीय का ?”..

“लग्न...!.अनीता..या एका गोष्टीसाठी मी आता लग्न का करू पुन्हा? माझं स्वतःचं स्थिरावलेलं जीवन, माझं घर, माझा मुलगा या सगळ्या व्यवस्थांशी तडजोड करु का पुन्हा मी ? अनीता.. एका स्त्रीकरिता लग्न म्हणजे त्या पुरुषाच्या घरी जाऊन त्याची सेवेकरी होणं, त्याच्या मुलांना जन्म देणं, किंवा त्याच्या आधीच असलेल्या मुलांचं संगोपन करणं, त्याचं स्वयंपाकघर सांभाळणं, त्याच्या नातेवाईकांची मनं सांभाळणं, भरीला माझं मुलंही त्यात असेल तर ओढाताण सांभाळणं, पुरुषी इगो सांभाळणं. पुन्हा नाव बदलणं. पुन्हा अस्तित्व नव्याने सिद्ध करणं. कशासाठी करू मी हे सारं ...अनीता सांग ना”.....??

“अगं पण शारीरिक गरज एवढंच एक कारण असतं का संध्या..आज अजून तरूण आहेस. उद्या अपूर्व मोठा होऊन त्याच्या दुनियेत रमेल. म्हातारपणी तुला अधिकच एकटं वाटणार नाही का. तेव्हा जोडीदाराची गरज अधिक भासेल.”

संध्या जोरात हसली. “काय हे अनिता. तू ना अगदीच कुठल्या पिढीतल्या गोष्टी करतेस? अगं म्हातारपणीही दोघांपैकी कोणीतरी एक पुढे मागे जाणारच ना? कोणीतरी एक एकटं राहणारच ना पुन्हा? आणि ते कधी, कसं घडेल हे सांगू शकतो का? अंबरिश तर अवघ्या तिशीतच गेला ना?”

“तुझं सगळं म्हणणं खरंय. संध्या. पण हे अनैतिक आहे असं नाही वाटत का तुला ? शिवाय तो लहान आहे तुझ्याहून बराच. आणि त्याचं लग्नं, त्याची बायको, मुलं, संसार ..त्याचं काय ?....

“त्याचं नाव शेखर आहे. अनिता. माझ्या शेजारच्या बंगल्यात पेईंग गेस्ट म्हणून राहत होता. तेव्हा ओळख झाली. अतिशय उमदा माणूस आहे गं तो. आणि खूप रसिक, समंजस. मित्रच समज माझा चांगला. केवळ शारीरिक गरजेने नाही एकत्र आलो. पण हो, ती गरज नाकारलीही नाही आम्ही. काय नैतिक अन् काय अनैतिक याचा विचार नाही केला आम्ही. कारण यात कुणाचंही शोषण करत नाही आम्ही. आनंदच देतोय एकमेकांना”

“एकमेकांचा सहवास आवडतो आम्हाला, परंतु एकमेकांना बांधूनही ठेवलं नाहीय आम्ही. एकमेकांवाचून अडेल अशी कोणतीही बाकीची गरज नाहीय दोघांनाही. इथून तो गेला, की तो त्याच्या विश्वात अन् मी माझ्या विश्वात असते. फोनही करत नाही आम्ही फारसे एकमेकांना.

त्याचं लग्नं नाही झालंय अजून. पण होईलही आज ना उद्या. मी अडकवून ठेवणार नाहीय त्याला. माझ्यापाशी बांधूनही ठेवणार नाहीय. एका चांगल्या घरातला भला मुलगा आहे तो. करीअरमधली स्वप्नं पाहणारा. आपल्या नोकरीतलं काम मनापासून एन्जॉय करणारा.”

“अगं पण. उद्या त्याच्या बायकोला कळलं तर. त्याचा संसार उद्धवस्त नाही का होणार ?”

“मी एवढा लांबचा विचार करत नाही. अनिता. लग्न त्याला करायचंय अन् संसारही त्याला. तर ते प्रश्न त्याने सोडवायचेत. आपल्या बायकोला काय सांगायचं न् कसं सांगायचं. किती सांगायचं, कशी बायको निवडायची. हे त्याचे प्रश्न आहेत. आणि तो ते सोडवायला समर्थ आहे असं मला वाटतंय. मी माणसाच्या साध्या सुध्या जगण्याला गुंतागुंतीचं करू इच्छित नाही. आणि मन मारून, किंवा शरीर मारून म्हण, हवं तर ...जगूही शकत नाही. अन् एवढ्या एका गोष्टीसाठी सर्व तडजोडी आणि ताण स्वीकारत पुन्हा लग्नंही करू शकत नाही.”

“लोक बोलतात काही बाही......त्यांचं काय ?...उद्या अपूर्व मोठा होईल, त्याच्या कानावर जाईल त्याचं काय ?...संध्या....तो उद्या तुला प्रश्न विचारेल.”

“नाही विचारणार अनिता” ! तो येणा-या पिढीतला युवक असेल. माणसाला माणूस म्हणून पाहणारा. विशेषतः स्त्रीला माणूस म्हणून पाहणारा. अनिता ‘स्त्री’ शब्दावर जोर देत म्हणाली. स्त्रीला देवी किंवा कुलटा समजणारा नाही. मी त्याच्यावर जाणीवपुर्वक संस्कार करतेय काही. आणि याउप्परही तो इतर सर्वसामान्य पुरुषासारखाच जर मला विचारू लागलाच, तर मीही त्याला सांगेन. माझं आयुष्य मी जगले. ते कसं जगायचं हा माझा प्रश्न होता. अंबरीश जिवंत असता तर त्याचा प्रश्न होता. मी त्याला बांधील होते, या गोष्टींची उत्तरं द्यायला. तुला नाही. तू आता बराच मोठा आहेस. तुझं स्वतंत्र जीवन माझ्यापासून वेगळं जगायला. तुला हवं तसं.

आणि लोकांचं काय, गाढव आणि बापलेकाची गोष्ट माहीत आहे ना? लोक कुठूनही बोलतातच.

आणि हो, अजून एक.. मला अनेक दुसरेही मित्र आहेतच. पण ते फक्त मित्रच आहेत. जशा मैत्रिणी असतात तसेच ते.

संध्याचा चेहरा आणि स्वर दोन्ही ठाम होते. पण चेह-यावर कोणताही अट्टाहास नव्हता. मुळातच सुंदर असलेल्या संध्याच्या चेह-यावर चांदणं उजळलेलं दिसत होतं, आणि ती अधिकच सुंदर दिसत होती.

अनिता निरुत्तर झाली होती. विरोधाला विरोध तर ती करू शकत नव्हती. संध्याच्या काही गोष्टी पटतही होत्या. तर काही प्रश्नही उठतंच होते मनात. पण संध्याच्या प्रश्नाला तिच्याजवळ उत्तर नव्हतं. तिने दुसरं लग्न का करावं ?. कारण विवाहसंस्थेत सा-याच तडजोडी या स्त्रीलाच कराव्या लागतात. त्या एकदा करून तिने बस्तान बसवलंय...तेच आता तिनं पुन्हा का करावं ? अनिता अनेक उदाहरणं पाहत होती आजुबाजूला. विधुर पुरुषांची. कोणत्याही वयातले बहुतांश विधुर पुरुष बायको मेल्यावर वर्ष दोन वर्षाच्या आत लग्न करताना पाहत होती. तिच्या अगदी शेजारी राहणारे एक गृहस्थ तर वयाच्या अडुसष्ठाव्या वर्षी, बायको मेल्यानंतर नऊच महिन्यांनंतर दुसरं लग्न करून मोकळे झाले होते. बायकोशिवाय मी राहू शकत नाही, असं चक्क घरातल्या मोठ्या मुलांना-सुनांना सांगून. साहजिकच आहे. पुरुषांना आपली बसलेली घडी त्याकरिता मोडावी लागत नाही. आपलं नाव, गाव पुन्हा सोडावं लागत नाही. त्यांच्या जीवनक्रमात काही फरक पडणार नसतो. उलट घरी येणारी व्यक्ती ही सेवा करण्याकरिता उपलब्ध होण्याचीच शक्यता अधिक असते. स्वयंपाक-पाण्यासह.

अनिताला अजून एक ओळखीचे गृहस्थ आठवले. त्यांनी बायको गेल्यावर दुसरं लग्न नाही केलंय. लोकांना त्यांचं खूप कौतुक वाटतंय. परंतु तिला कळलं, की हे गृहस्थ एका कंपनीत मोठ्या पदावर आहेत. सतत परदेशी दौ-यावर असतात. अन् तिथं त्यांच्याच नव्हे, तर अनेक पुरुषांच्या अगदी शारीरिक सोयी देखील सहजी पुरवल्या जातात. मग ते अनैतिक नाही का? उलट त्यातून शरीरविक्रयाचा एक समांतर बाजार उभा केलाय आपल्या व्यवस्थेने. शोषणाच्या पायावर.

पण बहुतांश स्त्रिया, अगदी कुठल्याही वयातल्या, वैधव्य आल्यावर फारच क्वचित लग्न करताना दिसतात. अगदी तिशीतल्या देखील दुसरं लग्न करायला मनापासून राजी नसतात. याची कारणं तीच असतील. जी संध्याने सांगितली. पण मग त्यांच्या शरीराच्या हाकेचं काय. संध्यासारखीच काही उदाहरणांत कुणकुण येते कानावर. पण

समाजाने त्यांना जर पर्यायी व्यवस्था दिलेली नाही पुरुषांसारखी, तर त्यांनी करायचं काय ? त्यांना कोणत्या तोंडाने शरीरावर नियंत्रण ठेवा सांगायचं ? न् कोणत्या तोंडाने सारी तडजोड नाहीतर पुन्हा करा, त्या गोष्टींसाठी... हेही सांगायचं? आणि जर तसं करायला सांगितलं तर मग ही व्यवस्था त्यांच्या शोषणावरच उभी आहे असंच म्हणावं लागेल. आणि तीच अनैतिक ठरेल.

अनिताच्या मनात उलटसुलट अनेक प्रश्न उठत होते. उत्तरं नव्हती. पर्याय दिसत नव्हते. पण आता संध्याबद्दल अढी, राग काहीच नव्हतं मनात. होती ती फक्त काळजी. हा समाज तिला सुखाने जगू देईल का............? अनिताने तिच्या खांद्याभवती हात टाकून तिला मायेने जवळ ओढलं..आणि
या विचारांतच तिला कधी झोप लागून गेली ते कळलंच नाही.





काटा रुते कोणाला ..... अर्चना कुलकर्णी - ठाणे.

आज सकाळपासून, की काल संध्याकाळपासून माझे मन कशातच नाही. आईलाही ते जाणवले आहे म्हणून सारखी माझ्या पुढे-मागे करते आहे. त्याचाही आता त्रास होतोय. आईला सांगू शकत नाही. तिला आधीच फार विवंचना आहेत. आज कामावर जाण्याचा पण मूड नाही. छे, घरातून तर बाहेर पडू या. बघू काही उत्तर सापडते का बस, अशा विचारात बाहेर पडले, आणि स्कूटी स्टार्ट केली. आज नेहमीचा रस्ता सुद्धा अनोळखी झाला. एका वळणावर अचानक एका पाटीने माझे लक्ष वेधून घेतले. नारी समता मंच. yes आता इथे जावून प्रयत्न करू या आपले मनोगत सांगण्याचा. थांबले तिथेच. पण मनाचा निश्चय होत नव्हता. हळूहळू करत पहिल्या मजल्यावरील त्या कार्यालयात शिरले. काम करणाऱ्या महिलांनी मला बसवयास दिले अन् माझ्या गर्भार पोटाकडे, हळूच गळ्यातल्या मंगळसूत्राकडे ,कपाळावर नसलेल्या टिकलीकडे नजर फिरवली. का आली असेल ? असे चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह सहज वाचता येत होते. तेवढ्यात संचालिका बाई आल्या. अतिशय प्रेमळ, मृदु आवाजात म्हणाल्या, 'बोल बेटी ,काय हवे आहे तुला ?'" त्यांचा मृदू पण आश्वासक आवाज ऐकून माझ्या डोळ्यातून कालपासून साठून राहिलेले पाणी झरू लागले. थोडा वेळ जावू दिला त्यांनी आणि मग पाठीवरून मायेने हात फिरवत म्हणाल्या, तू आता इथे आली आहेस, कसली ही काळजी करू नकोस, जे मनात असेल जो काही त्रास असेल ते सांग. अश्रू आवरून मी सांगू लागले. मला त्रास स्वतःला काही नाही. पण जे सांगायचे आहे ते खूप मोठे आहे. काही हरकत नाही, तू सांग मला "त्या आधी तुझे नाव तरी सांग.

त्यांच्या त्या बोलण्याने मनाचा निर्धार केला आणि मी म्हटलं..

“माझे नाव रेवा, मी एका IVF सेंटर मध्ये काउन्सेलर म्हणून काम करते, आमचे डॉक्टर पाटील शहरातले नावाजलेले, प्रतिष्ठित स्त्रीरोग तज्ञ, प्रसूती तज्ज्ञ आहेत. महिन्यापूर्वी आमच्याकडे एक स्त्री आली होती. फार मोठी नाही, असेल २२ -२३ वर्षांची. गौरी तिचे नाव. दिसायला अतिशय सुंदर, नाजूक. डोळे पण छान बोलके. तिच्याबरोबर तिचा नवरा नव्हता आला तर सासरे आले होते. हेच आधी मनाला पटले नव्हते. ती डॉक्टरांकडून काम झाल्यावर माझ्याशी बोलायला आली. अर्थात माझे ते कामच होते. डॉक्टरांनी तिला समजवायची जबाबदारी माझ्यावर टाकली होती. तिचे शरीर गर्भ धारण करण्यास अनुकूल नव्हतं, उगाच टेस्टट्यूब करण्यात अर्थ नाही. आमचे डॉक्टर त्याबाबतीत एकदम शिस्तीचे. जर यश मिळणे शक्य नसेल तर कोणाला आशा लावायची नाही. मिळतो म्हणून पैसे घ्यायचे नाहीत. आता हे सर्व मी तिला सांगितले. तिच्या नजरेतली चमक पूर्णपणे नाहीशी झाली ... सासरे उठून पैसे भरायला गेले, तेव्हा ती पटकन म्हणाली, "चलो अब सभी आशा खात्म हो गयी !' मला राहवले नाही, खूप समजावले तिला, तेव्हा म्हणाली, “इस से पहले दो डॉक्टर के पास जा के हुआ है ।दोनो बार तिसरे महिने मे सब खत्म होता था !" यहां आ के पहले ही दिन सब खतम." मनात आले, अरे बाप रे..! इतक्या लहान वयात. कसे झेलले तिने. तितक्यात सासरे आले. अगदी हसून, बेटी इस को कुछ समझावो ! अब नही होगा बच्चा तो हम क्या करेंगे ? मग इतक्या लहान वयात सारखे डॉक्टर कडे का घेवून जाता ? तिचा नवरा का सोबत येत नाही ? हे सारे प्रश्न मनातच राहिले. गौरी चेहऱ्यावर घुंघट घेवून चालू लागली. आणि तो विषय सुद्धा ....

काल परत तेच तिचे सासरे आले होते. एका १७-१८ वर्षांच्या मुलीला घेऊन. ती त्यांची होणारी सून होती. तेच तुपकट हसू दाखवून म्हणाले हिची अगोदरच तपासणी करून घेतोय. म्हणजे नंतर काही भानगड नको. पण गौरी ? डोळ्यात थोडेसे (खोटे)दुःख दाखवत म्हणाले. तुम्ही तिला एवढे समजावले. आम्ही घरून पण म्हटले, आपल्याला वारस नाही झाला तर काही काळजी नाही. हवे तर दुस-या डॉक्टरकडे जाऊ.. पण तिचे कामात लक्षच नव्हते. आम्ही घरात नव्हतो आणि माहित नाही, कसे काय गॅसचा स्फोट

झाला आणि गौरी गेली. आता तीन महिने झाले. घरात कोणी बाई माणूस नाही. पोराला म्हटले कर दुसरे लग्न. दुसरं काय करणार नं? मी पाहिले तर ही दिसायला गौरीपेक्षाही सुंदर. पण चेहऱ्यावर गरिबी दिसून येत होती. तिच्या डोळ्यातले भाव मला जाणवले. काय कारुण्य होते तिच्या नजरेत. तिची आई पण सोबत होती. आईची नजर ओशाळवाणी होती. मनात येत असावे, लग्नापूर्वी अशी तपासणी का करावी ? पण गरिबीला बोलता येत नाही. डॉक्टरना भेटले. सगळे ठीक आहे. असा निर्वाळा मिळाला. ते तिघे निघून गेले. आणि मला सुचेनासे झाले. खरच गौरी कशाने गेली असेल ? ती पण गरीबच होती का ? ती त्याची पहिली बायको होती की कितवी ? तो तिचा नवरा का येत नाही ? की हा म्हातारा माणूसच नवरा. किंवा त्याची आई देखील कशाने वारली असेल ? आणि बायको म्हणजे फक्त प्रजोत्पादन करणे असे का आजही महत्वाचे मानले जाते ? तिला मन नसते का ? तिच्याच बाबतीत असे नाही पण अजूनही मुलगी झाली म्हणून कपाळावर आठी घालणारे वडील दिसतात. अशिक्षित सासू दिसते. एवढेच नाही तर शिक्षित सासूदेखील पाहिली आहे. अगदी परवाच. फक्त ती आरडओरडा करत नाही हाच काय तो फरक. मुलगी, नात झाली असे म्हटल्याबरोबर तिला न बघता आजी ऑफिस ला गेली. मग सून म्हणाली, नातू झाला असता तर सासूबाई VRS घेणार होत्या. पण आता काही त्या नाही घेणार. म्हणजे फक्त मुल नाही तर मुलगाच च हवा असा हट्ट का ? किती पिढ्या असे चालणार ? मुली होणे चूक आहे का ? मुल झाले झाले नाही तर स्त्री जगू शकत नाही का ? तिला किती स्त्रिया समजून घेत असतील ? खूप उद्धवस्त झाले आहे मी ...।

रेवा शांत हो , तुझ्या ह्या परिस्थितीत तू जास्त tension घेवू नकोस. तुझ्याकडे त्यांचा पत्ता आहे का ? किंवा फोन नंबर ? पत्ता, फोन नंबर मी नाही देवू शकत. आमच्या हॉस्पिटलच्या नियमांविरुद्ध आहे ना ?” “अग पण जर तू काही नाही दिलेस, तर आम्ही कसे शोधणार ? आपण कदाचित अगोदर घडलेल्या घटनांबाबत काही करू शकणार नाही. पण आता जी मुलगी लग्न करणार आहे तिची तर काळजी घेवू शकतो ना ? ती लग्न मोडणार ही नाही, पण तिला कल्पना दिली, तर ती सजग राहील तू देतेस का

नंबर ?” “थांबा, मी आधी डॉक्टरांना विचारते. oh नो , मी मोबाईल घरीच विसरले वाटते. आता आई काळजी करणार. तिने हॉस्पिटल मध्येही एव्हाना फोन केला असेल. मी आधी घरी जाते. उद्या येवून सर्व काही सांगते.” अन तिथून मी बाहेर पडले ...।

मी तिथून बाहेर पडली ती काहीशी हलकी होवूनच. काल पासून जे मनावर मळभ आले होते ते दूर झाल्यासारखे वाटत होते. घरी जाताना खात्री होत होती, की जरी आपण गौरीला मदत करू शकलो नाही तरी ह्या सुंदर मुलीला तरी आपण सावध करू शकू. लग्न ठरले असल्याने मोडण्याचा विचारही तिच्या घराची माणसे करणार नाहीत, पण तिच्या बाबतीत काही गैर घडू नये हे तरी पहात येईल. ह्या विचारात आपले घर कधी आले ते कळलेच नाही.

आई वाट बघत होती. “काय झाले रेवा ? बरे नाही का ? आणि मोबाईल घरीच कसा राहिला ?” “नाही गं, जरा डोके दुखते आहे, मी विश्रांती घेते. होईल बरे, तू नको काळजी करूस.” “असे कसे काळजी नको करूस. दोन जीवाची आहेस तू. जरा दुध पी आणि मग आराम कर” ...।

आज दोन दिवसांनी मी परत त्याच कार्यालयात जाते आहे . डॉक्टर ना पूर्ण कल्पना दिली. त्या माहितीचा दुरुपयोग होणार नाही हे पटवून दिले आणि मी तो नंबर त्यांना देते आहे. मी आत शिरताच, ‘अरे वा, रेवा आज अगदी छान दिसते आहेस. बस इथे’. परत तेच मृदू शब्द. जीव सुखावतो असे ऐकून. त्यांना नंबर, पत्ता दिला. माझ्याकरिता आलेला गरमागरम चहा घेण्याचा आग्रह मला मोडवेना. चहा घेत असताना मला म्हणाल्या, "मला कल्पनाताई म्हणतात. तू मला मावशी म्हटलेस तरी चालेल.पण तुझ्या मनातले जे वादळ आहे तेही तू सांग”.

" छे तसे काही नाही "

"अगं, कदाचित तुझ्या जन्माच्या आधीपासून मी ही कामे करते आहे, आधी संस्था नव्हती, घरूनच करायची. लष्कराच्या भाक-या असे सर्वजण म्हणायचे. पण मला स्वस्थता हे काम करूनच मिळते. बोल तू निसंकोच पणे.

कल्पना मावशीचे ते शब्द ऐकून माझ्या मनाचा बांध फुटला. का रडायला लागले हेही कळेना

"हे बघ मनाला त्रास होत असेल तर नको सांगूस, पण सांगशील तर उपाय ही सापडेल." पाठीवर फिरणारा हळुवार हात. तोच हातात घेवऊन सांगू लागले. “मी रेवा. हे तर तुम्हाला माहित आहेच. आई -बाबांची एकुलती एक. खूप लाडात, पण शिस्तीतही वाढवले आई-बाबांनी. मी होमेओपथि च्या शेवटच्या वर्षाला असताना एका मैत्रिणीच्या लग्नात माझी आणि राजेशची गाठ पडली. त्याला मी बघताक्षणी आवडले. आणि दोन तीन दिवसात एखाद्या चित्रपटात घडावे तसे तो मला कॉलेजला भेटण्यास आला. माझे शिक्षण पूर्ण होत होते. मी लगेचच घरी सांगितले. आईचा पहिला प्रश्न, “तुला पण तो आवडला आहे का ? काय करतो ? त्याच्या घरी माहित आहे का ? आपली जात वेगळी आहे हे त्याला सांगितलेस का ?” प्रश्नाची सरबत्ती सुरु राहिलीच. तितक्यात राजेश आमच्या घरी आला. त्याने माझ्या आई -बाबांचे मन जिंकले. B.Tech .. M.B.A. चे त्याचे शिक्षण. चांगल्या पगाराची नोकरी. बोलण्यात वागण्यात नम्र. दिसण्यास रुबाबदार. अजून काय हवे ? त्यातून माझे शिक्षण पूर्ण होईस्तोवर थांबू या. तोवर भेटण्यास परवानगी मोठ्या हुशारीने त्याने घेतली. ते सहा महिने खूप आनंदात गेले. सुरुवातीला त्याच्या घरून जातीमुळे विरोध होता. पण कदाचित मुलगा ऐकत नाही म्हणून किंवा मीही त्यांना पसंत पडले असेन, त्यांचा विरोध मावळला. इतका, की लग्नात कोणी काही बोलले तर राजेशची आई आमच्या बाजूने उत्तर देत होती. खूप हौसेने आईबाबांनी, राजेश च्या घरच्यांनी लग्न केले. लग्नानंतर ही सासू, असे कधी त्या वागल्याच नाहीत. आपल्याकडे असे करतात, असे समजावून सांगत. तुझ्या माहेरी काय करतात असे उत्सुकतेने विचारत ? सहा महिने सर्व सण. सुट्ट्या दोन्ही कुटुंबे आनंदात घालवत होतो. त्यांना जाणीव होती, एकच लेक मग तिच्या आई बाबांना आता एकटे वाटत असेल म्हणून मुद्दाम बोलावून घेत. तुझ्या करिता सुरुवातीला घरूनच दवाखाना सुरु कर मग आपण दुसरीकडे शोधू असे म्हटले गेले. आणि जून मध्ये राजेश कामावरून घरी परतत असताना रस्त्यावरच्या खड्ड्याचा अंदाज आला नाही

.... आणि तो उडून नेमका ट्रकच्या समोर ... क्षणात होत्याचे नव्हते झाले ...डोळ्यापुढे अंधकार ...!

मला तर काहीच कळेना. आठवडाभरापूर्वी डॉक्टर मी आई होणार , ह्याचे घरी CELEBRATION केले होते. आणि आता अशी स्थिती झाली होती. येणारा प्रत्येक जण हळहळत होता. त्यातच कोणी एक सासूबाईची मैत्रीण आली होती. सगळे विचारून झाले आणि मग हळूच म्हणाली. सुनेची पत्रिका पाहिली होती का ? अर्थातच नकारात्मक उत्तर मिळाले. मग एक एक कहाण्या कडक मंगल. कोणी म्हणे राक्षस गणी असले, की असे होते. आपण कोणत्या प्रसंगाला आलो आहोत. मी तिथेच बाजूला बसून रडते आहे. हे कोणी समजून घेत नव्हते. शेवटी आईनेच मला दुस-या खोलीत नेले. वयाच्या चोविसाव्या वर्षी माझ्या वर असा प्रसंग यावा. ह्यात दोष कोणाचा ? माझाच ? की माझ्या नशिबाचा ? कोण लिहिते हे नशीब ? आपणही असेच निघून जावे वाटू लागले. कशासाठी जगायचे? तेव्हा खूप धीर दिला आई-बाबांसोबत माझ्या मैत्रिणीनी. खूप समजूत घातली. तुझ्याबरोबर तू येणाऱ्या ही जीवाला त्रास देते आहेस असे म्हणून बळेबळे खायला लावले. चारच दिवस झाले आणि राजेशची आई म्हणाली, "तुला इथे राहून त्रास होईल, तू माहेरी जा, मी तुझ्या आईला बोलावून घेते"

आणि मी माहेरी आले. समजले नाही त्यांच्या बोलण्यात प्रेम होते की मुद्दाम मला दूर केले जात आहे. आई कडे आल्यावर मी थोडे शांत झाले. मैत्रिणी येऊ लागल्या. खूप वेगवेगळ्या विषयावर गप्पा होवू लागल्या. पण कोणी हि राजेश चा विषय काढत नव्हते. एका मैत्रिणीच्या ओळखीने ह्या डॉक्टरच्या हॉस्पीटल मध्ये नोकरी देखील मिळाली. खूप काही नवीन शिकायला मिळते आहे. मी शांत आहे असे वाटते. तोच काही दिवसांनी आई -बाबांचे बोलणे कानावर पडले. राजेशच्या आकस्मिक मृत्यूला मीच जबाबदार आहे असे राजेशच्या आईने बाबांना सांगितले. रेवाला परत आमच्या घरी पाठवू नका. तिच्यामुळेच आमचे सर्व सुख नाहीसे झाले आहे. असे बरेच काही बोलण्यात आले. त्यामुळे आई-बाबा माझ्याशी आता तो विषय काढीना. शेवटी मी

मैत्रीणीना विचारले. नक्की काय झाले आहे ? तेव्हा ज्योती (माझी जवळची मैत्रिण) म्हणाली अग राजेशचे जे काही पैसे आले त्यावर तुझा अधिकार नाही. घरातही तुला स्थान नाही असे सांगितले आहे. तू तरुण आहेस, तू कमवू शकतेस. दुसरे लग्न पण करशील मग तुला राजेशच्या घराकरिता काही करावे लागणार नाही. त्यामुळेच तुला आता काही अधिकार नाही. आई- वडिलाच तोच एक आधार होता. पण मग होणा-या बाळाचे काय ? त्याचा आधार कोण ? त्याचे वडील नाहीत, म्हणून कोणीही नाही का ? त्यावर देखील त्यांचे उत्तर होते. जर मुलगी झाली तर ती दुस-याचीच होणार मग तिलाही अधिकार नाही. जर मुलगा झाला तर आम्ही त्याला सांभाळू. पण रेवा नको. का का का ? ह्या प्रश्नांना उत्तरे नाहीत. आई बाबा सध्या शांत आहेत, मला न कळू देता वकिलाचा सल्ला घेत आहेत. मला ह्या अवस्थेत कोणताही त्रास देण्याचा त्यांचा विचार नाही ...

पण मावशी मला सांगा आजही असेच का चालू आहे ? मुलीची पोटातच हत्या करण्यात येते. हे जितके वाईट आहे त्या पेक्षाहि भयंकर अशी ही वागणूक आयुष्यभर स्त्रीला दिली जाते. कोणाला मुल होत नाही म्हणून छळ. मग देवादिकांचे उपास =तापास ते देखील तिनेच करायचे. जिला मुल होत नाही अशा स्त्रिला इतर स्त्रियादेखील नीटपणे समजून घेत नाहीत. तर कोणाला मुलीच होतात म्हणून छळ कोणाला पर - पुरुषांशी बोलायला बंदी तर, तर कोणाला पेहरावावर बंदी. आई -वडीलांनी खूप कौतुक केले, तरी सासरी मिळेल ह्यांची खात्री नाही. तिलाच का आयुष्यभर सर्वांच्या नजरा रोखलेल्या अवस्थेत जीवन व्यतीत करावे लागते ? का उत्तर नाही ह्या प्रश्नाला ? ....

मला अजून महिनाभरात मुलगा / मुलगी होईल. पण त्याच्या हक्काकरिता मी झगडावे का ? मी झगडले तरीही सर्वांची सहानुभूती ही राजेशच्या आई-बाबांकारिताच राहिल हेही मला माहीत आहे. इतर कोणी कशाला माझे मन पण म्हणते की त्यांचे बरोबर आहे, वृद्धपणी त्यांनी कशाच्या आधारावर जगावे ? पण मी काही वाईट न वागता देखील माझ्याशी असे का वैर करावे ? बरे मी तर बाहेरची, पण होणारे मुल हे त्यांचे नातवंड असेल तरीही ते नाकारू शकतात ? मला त्रास न व्हावा म्हणून प्रयत्न करणाऱ्या आई-

बाबांना माहीत नाही की मी किती मोठ्या तणावाखाली जगते आहे. त्यांच्यासमोर मला काही माहित नाही. असे दाखवत आनंदाने राहते आहे. त्यात असे गौरी सारखे काही कळले, की मी उन्मळून पडेन की काय अशी भीती वाटते ...

पण मावशी माझा निर्धार मी केला आहे, मी हक्काकरिता झगडणार आहे. त्यावेळेस नक्की तुमच्या कडे येईन. जर मी दोन महिन्यात तुम्हाला भेटायला नाही आले, तर ही माझी कहाणी माझ्या अक्षरात लिहून तुमच्याकडे देते आहे. तसेच माझा पत्ता पण आहे. तुम्ही मला न्याय मिळवून द्याल ना ? “.....





વ્હીલરના સ્ટોલ પાસે– રાજુ પટેલ - મુંબઈ

જે રીતે મનભાવન વાનગી ના વિચારે મ્હોમાં પાણી છૂટે એ રીતે મનને જો કોઈ મ્હો હોય તો 'મરીન લાઈન્સ' વિચારતાં જગેશના એ મનના મ્હોમાં નિશાની કલ્પનાથી પાણી છૂટતું હતું...આજે સાંજે ચાર વાગ્યે મરીન લાઈન્સ સ્ટેશનના પ્લેટફોર્મ નં.૧ પર વ્હીલરના સ્ટોલ પાસે નિશા મળશે..!! એણે ગળા પર બ્લ્યુ સ્કાર્ફ વીંટ્યો હશે- અને પોતે લાલ ટીશર્ટ પહેરશે એવું નક્કી થયું હતું.

એક માત્ર દીકરીના લગ્ન ઉકેલ્યા બાદ જગેશનું પત્ની સુજાતા સાથેનું ઔપચારિક જોડાણ પણ જાણે કપાઈ ગયું હતું. જીવનમાં શું ખૂટતું હતું ...? ઠીક ઠાક ધંધો, સુશીલ પત્ની, વર્કિંગ વુમન...ઉપરાંત ગોરી પણ હતી..!!
શૂન્યમાં તાકતા જગેશે બારી બહાર જોયું.વિવાહ ના શરૂના વર્ષોમાં ભરતીની જેમ ઉભરાતા રોમાન્સ માં ક્યારે ઓટ આવી ગઈ ખબર પણ ન પડી...દીકરી જન્મી અને સુજાતા વહેંચાવા માંડી...અને ધીરે ધીરે લગ્નજીવન માં બધું બોરિંગ- ફંક્શનલ થઇ ગયું . ડીટીપીનું કામ કરતાં જગેશે કોમ્પ્યુટર સોફ્ટવેરના વિક્રેતા નું કામ શરુ કર્યું. ડીટીપીનું કામ ફુરસદ માં રહેતી સુજાતા એ સંભાળી લીધું.જગેશ મુંબઈની આજુબાજુના વિસ્તારોમાં સોફ્ટવેરની લે-વેચ માટે રખડતો અને સુજાતા ઘેર બેઠાં ટાઈપીંગ કરતી.

" મનડાનું મકાન મારું સજાવું ઠાકોરજી સારું....." ઊંચી હલક માં એક ભિક્ષુક ટ્રેનમાં ભજન ગાઈ રહ્યો હતો. મનડાનું મકાન...!! જગેશ ફિક્કું હસ્યો : પરણતી વેળાએ ઝગમગ કરતું એ મકાન ફીકું પડી ગયું હતું અને ફરી કેમ ચમકતું કરવું એ સમજાતું નહોતું. જીવન બોઝિલ બની ગયું હતું. પૈસો હતો પણ આનંદ નહોતો. સાહચર્ય હતું પણ શ્રૃંગાર નહોતો. અન્ન હતું પણ ઓડકાર નહોતા.

અને દીકરીના લગ્ન બાદ તો કોઈ હક જ ન બચ્યો...!! શું કરવું આ જિંદગીની રીયાસતનું...? ઈન્ટરનેટ પર જડી આવેલી વર્ચ્યુઅલ ફ્રેન્ડશીપની બારીમાં ડોકિયાં કરી જગેશ ખાલીપાનો ઉપાય ખંખોળવા માંડ્યા. ત્યાં આ નિશા ભટકાઈ. નિશાની તસ્વીર જોતાં જગેશનું હૃદય એક ધબકારો ચુકી ગયું.—એ શ્યામ વર્ણની હતી...જે જગેશને ખૂબ ઉત્તેજક લાગતો... ડેસ્પરેશન કળાય નહીં એની સાવચેતી સાથે જગેશે હળવે હલેસે મૈત્રીનો તરાપો નિશાના કાંઠા તરફ હાંકવા માંડ્યો એ કાંઠે થી આવતાં બધાં જ તરંગો જગેશના તરાપાને જાણે રસ્તો બતાવતા ગયા : શ્યામ તો એ હતી જ, વળી વિધવા હતી....ગુડ બીજો છેડો ઉલઝેલો નહોતો..!! સ્વતંત્ર આવક હતી, વધુ ગુડ—લાચારીની કોઈ ગાથા નથી. કાયમી સંબંધમાં માં રસ નહોતો... સહુથી વધારે ગુડ- કોઈ કમિટમેન્ટ જ નહીં...!! હવે તરાપો કિનારે પહોંચવામાં હતો- નેટ-મૈત્રીના વર્ષભર ના ધૈર્યપૂર્ણ માઉંટીન્ગ બાદ આજે નિશા રૂબરૂ મળવા રાજી થઇ હતી.

મરીન લાઈન્સ એ સાડા ત્રણ વાગ્યે જ પહોંચી એ ગયો –હજી અડધો કલાક બાકી છે. એ પ્લેટફોર્મ નં. ૨ પર એવાં બાંકડા પર બેઠો કે જ્યાંથી મિલન-મુકામ વ્હીલરનો સ્ટૉલ સ્પષ્ટ દેખાય.

કેવું હશે આ મિલન...? નિશા એનો ચહેરો જોઈ છેતરાયાના ભાવને કારણે અપસેટ તો નહી થઇ જાય ને..? એક તનાવ સાથે આ વિચારતાં જગેશે ખીસામાં થી બાળપણ ના ભેરુ ગોવિંદનો ફોટો કાઢ્યો. નક્કી કર્યા પ્રમાણે જગેશે લાલ ટીશર્ટ નહોતું પહેર્યું પણ આ ગોવિંદનો ફોટો ઓળખ માટે પુરતો હતો...વિજાતીય મૈત્રી ના પ્રયાસોના છાનગપતિયાં કોઈ ને ખબર ન પડે એટલે જગેશ પોતાના સદગત મિત્ર ગોવિંદના નામ અને તસ્વીરના નકાબ સાથે ઈન્ટરનેટ વિશ્વમાં ફરતો હતો. ઇટ’સ ઓકે—નિશાને સમજાવી દઈશ... ૮૬મી વાર એમણે ખુદને ધરપત આપી... એને આત્મવિશ્વાસ હતો કે ગોવિંદ કરતાં તો એ દેખાવમાં બિલકુલ ઉતરતો નથી....નિશાને તો જે સરપ્રાઈઝ મળશે એ પ્લેઝન્ટ જ છે—સમજાવી શકાય કે સીક્રેસી અને પ્રાઈવસી માટે આવું કરવું પડે બાકી આ જો હું તો સદેહે હાજર છું જ કેમકે તારા જેવી દોસ્ત થી પરદો ન હોય...જેવું એ સમજાયું કે આ પરદો ફાડી નાખ્યો...--- ૮૭મી વાર જગેશે આ સંવાદ રીપીટ કર્યો.
ચાર ઉપર પાંચ મીનીટ થઇ ગઈ --- પણ ગળામાં બ્લુ સ્કાર્ફ વાળી કોઈ સ્ત્રી દેખાઈ નહીં...

અને એટલામાં થોડે દૂરના બાંકડા પર બેઠેલી સુજાતા દેખાઈ..!!...સુજાતા.. એની પત્ની- ...!!

###

સુજાતા એ સ્કાર્ફ ને પર્સમાં ફરી મૂકતા નિશ્ચય કર્યો—બહુ થયું એ વસંતને આ સ્કાર્ફ પરત કરશે-
પારકી વસંતથી એ કેટલો સમય જીવન મહેકાવશે..? ચોરી છીપે સર્જેલો આ સંબંધ જેટલી ઉષ્મા આપતો હતો એથી વધુ એની દોષ ભાવના દઝાડતી હતી...આખરે મોડું તો મોડું સુજાતાએ નક્કી કર્યું –રોજ રોજની આ ગીલ્ટ કરતાં સૂની સાંજો પરવડશે. બસ બહુ થયું... ગયા શિયાળાએ વસંતે એને ટાઢ થી બચવા આ બ્લ્યુ સ્કાર્ફ આપેલો –એજ પ્રથમ ઉપહાર પરત કરી સુજાતા આજે આ સંબંધને પુરો કરવા માંગતી હતી. ફરી એણે વ્હીલરના સ્ટોલ પાછળના ગેટ તરફ જોયું...વસંત હમેશાં ત્યાંથી આવતો....

###

જગેશ એક વિશાળ થાંભલાની ઓથે સંતાઈને નીરખ્યું કે –
સુજાતા પણ વ્હીલરનો સ્ટોલ સ્પષ્ટ દેખાય એમ બેઠી છે...અને એ સ્ટોલ તરફ જુએ છે - પોતાના પર્સમાં થી બ્લુ રંગનો સ્કાર્ફ કાઢે છે –ફરી મુકી દે છે અને ઘડિયાળમાં જુએ છે...આ ચાર ક્રિયાનું લૂપની જેમ પુનરાવર્તન કરે છે.
જગેશનો ચહેરો પડી ગયો---નીચી મૂંડીએ એ ત્યાં થી ચાલવા માંડ્યો.
અને પ્લેટફોર્મ નં. ૧ પર બ્લ્યુ સ્કાર્ફ ફરકાવતી નિશા પહોંચી... સહેજ મોડું થઇ ગયું એને...



~~..' **સાથ** '..~~રાજુલ ભાનુશાલી

"ચલા ભાભી, યેતે."

"ઢોકળાનો ડબ્બો લીધોને?"

"હોય."

એ ગઈ. એ એટલે મારી કામવાળી બાઈ.

વર્ષોથી કામ કરે છે. જીવનનો હિસ્સો બની ગઈ છે.

હું હવે સાવ એકલી.

છે......ક સાંજના સાત વાગ્યા સુધી.

બધા પોતપોતાના કામમાં વ્યસ્ત છે.. પતિ નોકરીમાં, સંતાનો ભણવામાં.

હું,

નવરીધૂપ.

ઓહ આ એકલવાયી બપોર..!

કાશ.. કંઈક નોકરીબોકરી કરતી હોત. પણ આપે કોણ?

ભણતર ૧૨ ચોપડી..! ઘર સંભાળવા સિવાય બીજું કંઈ આવડે નહીં..!

ગઈકાલની અધૂરી નવલકથા લીધી. વાંચવામાં મન લાગ્યું નહીં. મૂકી દીધી.

આવીને બાલ્કનીમાં ઉભી રહી.

પીપળાની એક ડાળીએ લોખંડની જાળીમાંથી છેક અંદર સુધી પગપેસારો કર્યો છે અને સતત મટકી મટકીને પોતાની હાજરી પુરાવતી રહે છે..એનાં લીલાછમ્મ કૂણા કૂણા પાન પર આંગળીઓ ફેરવી.. આહા..સુંદર અનુભૂતિ.. પર્ણો માં છુપાયેલી શીતળતા ટેરવાંથી થઈ સીધી હ્રદય સુધી પહોંચી ગઈ.આ પીપળો અહીં રહેવા આવ્યા ત્યારે માંડ બીજા માળની બાલ્કની સુધી આવતો, હવે તો ત્રીજા માળને ય ટાંપી ગયો છે.

આ જ પીપળા પર રહેતી ખિસકોલી ક્યારેક બાલ્કનીમાં ડોકિયાં કરે..

એક દિવસ સફરજન સમારીને હજુ તો રુમમાં આવી ત્યાંજ ડોરબેલ વાગી. પ્લેટ સાઈડ ટેબલ પર રાખી દરવાજો ખોલ્યો. કુરિયરવાળો હતો. દિકરીએ ફ્લીપકાર્ટથી ઓર્ડર કરેલું પુસ્તક આવ્યું હતું. લઈને એના રુમમા મુક્યું અને પાછી મારા રુમમાં આવીને જોઉં છું તો પેલાં ખિસકોલીબાઈજી બે પગ પર ઉભડક બેઠાં બેઠાં સફરજનની ચીર ગટક ગટક આરોગી રહ્યાં હતાં..!

કેવું મનોહર દ્રશ્ય..મન થયું, દોડીને એને પકડી લઉં. પણ એમ કંઈ એ થોડી હાથમાં આવે?

ત્યાંજ સ્થિર ઉભા રહીને જોયાં કર્યું, પણ બાઈજી ચાપ્ટર બહુ હો..એને કદાચ અણસાર આવી ગયો હશે મારી હાજરીનો ને એ ઘડીમાં તો રફુચક્કર..!

જતાંજતાં સફરજનની ચીર મોઢામાં દબાવવાનું ભુલ્યા નહી હોં..!

ગઈકાલે પાળી પર પૌઆં સુકવવા મુક્યા હતાં. થોડીવાર રહી દિકરીએ બૂમ પાડી," મમ્મા....,ચેવડો બનાવવો હોય તો અહીંથી જલ્દી પૌઆંની થાળી લઈ લેજે. નહીં તો આ ખિસકોલી બધાં ખાઈ જશે અને પછી તને ચેવડો બનાવવો જ નહીં પડે..!

બધાં ખડખડાટ હસી પડ્યા ને એ ખચકાઈને ભાગી ગઈ, ચેવડો બન્યો.

હવે તો આ નિત્યક્રમ થઈ પડ્યો છે.. એ અચૂક દિવસમાં બે ત્રણ વાર જાળીમાં ડોકિયાં કરે. એના માટે કંઈક પાળી પર મુકેલું જ હોય. થોડુંક ખાય થોડુંક લઈને દોડી જાય.

બપોરનો નાસ્તો તો અમે રોજ હવે સાથે જ કરીએ છીએ..!પણ સફરજન એનું સૌથી ફેવરીટ હોં..!

હવે મને બપોરે એકલવાયું નથી લાગતું.



सजा - डॉ.अलका सिंह

शादी के बाद आज सवितरी की बिदाई है लेकिन उसके चेहरे पर एक अजीब तरह का सूनापन है, एक अजीव तरह की वीरानी. वह ना मा से लिपटकर रो रही है ना ही इस घर के छूटने का दुख बयान कर रही है जैसा इस गांव की हर लडकी अपनी बिदाई पर करती है. वह चुप चाप एकांत में बैठ ज़मीन पर कंकड से कुछ लिख सी रही है. एक लकीर खींच कर छत की ओर ताकने लग रही है जैसे अपना भाग्य पढ ऊपर वाले से कुछ पूछ रही हो. फिर एक लम्बी चुप्पी, एक बौखलाहट उसके चेहरे को घेर ले रही है.

इस तरह सुन्न पडी सवितरी के जीवन में कल के बाद से कई तरह के सवाल खडे हो गये थे. वह सोच रही थी कि क्या मेरी गलतियां इतनी बडी थीं कि ......वह सोच रही थी कि अपाहिज़ होने के बाद क्या मेरा जीवन खत्म हो गया ? क्या मेरे सपने मर गये ?

कल फेरों के समय अपने पति को देख उसके पैर उठ ही नहीं रहे थे. नाऊन जबरदस्ती पकड कर उसके फेरे करा रही थी और वह बार बार रूक कर अपने पिता की तरफ

प्रश्न भरी नज़रों से देख लेती थी और उसके पिता अपनी बेटी से नज़रें चुरा लेते थे. नाऊन फिर उसे लगभग घसीटे हुए आगे बढा देती थी.

जब फेरे खत्म हुए उसने पिता से मिलने की इच्छा जाहिर की. घर मेहमानों से भरा हुआ था. सभी लोग विवाह की रस्मों रवायतों में व्यस्त थे. पिता बारात की आवभगत ऐसे कर रहे थे जैसे उस बारात ने उनके उपर अहसान कर दिया हो. वह बार बार दूल्हे के करीब जाकर उससे पूछते ‘ जमाई बाबू खतिरदारी में कोई कमी तो नहीं है?’ बरात में आये दूसरे लोग जैसे ही किसी चीज़ की इच्छा जाहिर करते सवितरी के पिता हाथ जोडे खुद ही उनकी खातिर में खडे हो जाते.

घर की इस गहमागहमी के बीच सवितरी के पिता से किसी ने कहा, ‘सवितरी आपसे मिलना चाह रही है” ’कह दो अभी आता हूं’ सवितरी के पिता ने जवाब दिया उधर सवितरी की मां सवितरी के पास बैठकर उससे बात करने की कोशिश कर रही थी. बार बार उसे हिलाकर पूछ रही थी का बात है बिटिया ? कौनो दुख है तुमको? ए बिटिया इहे औरत के जिनगी है , मलाल ना करो बिटिया ....गम करो

सवितरी सूनी आंखों से अपनी दुबली पतली मां को देखती और फिर सिर नीचे कर लेती और फिर डबडबायी आंखों से कुछ सोचने लगती सवितरी अपने सात बहनों में चौथे नम्बर पर थी. खूब खिलान्दडी, हर समय ठी ठी कर हंसने वाली. कभी मुहल्ले के लडकों के साथ गोली खेलती , कभी इक्कट दुक्कट और कभी गिल्ली डंडा.. जब भी मां किसी काम से उसे बुलाती वह घर से इतनी दूर भागती कि उसकी परछाई भी किसी को ना दीखे. घर में तब घुसती जब मां थक कर सो रही होती. वह हर रोज पेडों पर चढती. उछल्ती- कूदती.

उसका इस तरह उछलना कूदना किसी को रास नहीं आता था. गांव की बडी बूढियां उसे रोज कोसतीं. उसकी मां को समझातीं और कहतीं इसे लगाम लगा नहीं तो किस घर बसेगी ये. अपनी इसी आदत से वह बच्चों के झुड की सरदार थी. उस दिन भी वह पेड पर चढी ....जामुन के पेड पर ......वह जोर जोर से पेड को हिला रही थी. बच्चे नीचे जामुन बीनने में मगन थे कि अचानक जिस डाल पर वह चढी थी वही डाल टूट कर नीचे आ गयी.

गांव भर में हल्ला मच गया. सब दोपहर की नीद से जाग कर जब पेड के नीचे पहुंचे तो देखा सवितरी अचेत पडी है. लोग लाद फांद कर अस्पताल ले गये वहां पता चला कि उसका हाथ सात जगहों से टूट गया है. डाक्टर ने इलाज़ का खर्च बताया तो उसके पिता ने हाथ खडे कर दिये और सवितरी हमेशा के लिये अपाहिज़ हो गयी.

आज फेरों के वक्त अपने पिता की उमर का जीवन साथी देख सवितरी को अपना अपाहिज़ होना साल रहा था. अपने मन में हज़ारों सवाल लेकर वह अपने कमरे में बैठ अपने पिता का बेसब्री से इंतज़ार कर रही थी ......

रात काफी बीत चुकी थी. बारात की आवभगत से छुट्टी पाते ही पिता को याद आया कि उनकी बेटी ने उनको मिलने के लिये बुलाया है बेटी की इच्छा जानकर सवितरी के पिता सवितरी से मिलने उस कमरे में पहुंचे जिसमें वो बैठी थी. सवितरी ने रून्धे गले से अपने पिता से सवाल किया, “ हमरे लिये तुमको इहे दुलहा मिला था ? तुमने एक बार भी नहीं सोचा कि तुम्हारी बेटी उमर में इतनी छोटी है एक बार भी तुम्को खयाल नहीं आया कि तुम अपनी बेटी का ब्याह उसके बाप की उमर के आदमी से कर रहे हो एक बार भी नही बाबू ? एक बार भी नहीं ?”

पिता ने जवाब दिया, “बिटिया, किस बाप को दुख नहीं होगा कि उसकी 16 साल की लडकी की शादी 55 साल के आदमी से हो लेकिन क्या करूं बिटिया इस दुनिया में एक हाथ वाली लडकी से शादी करने के लिये बस यही दूल्हा तैयार हुआ. मैने अपनी शक्ति भर बहुत वर देखे, कई दरवाजे गया, लोगों के सामने गिडगिडाया, हाथ जोडे पर कोई तैयार नहीं हुआ”

“... तो इसका मतलब क्या हुआ बापू कि तुम इतनी उमर के आदमी के साथ अपनी 16 साल की बेटी” ....

और वह फफक पडी. ”तुम इंतज़ार तो कर सकते थे ना बापू, मैं अभी बूढी नहीं हुई जा रही थी .... तुम्हारा मन मान गया इस 60 साल के बूढे से अपनी 16 साल की लडकी को ब्याहने को ? तुम पिता नहीं दुश्मन हो मेरे”

दुश्मन पिता ने जवाब दिया , “मैं दुश्मन नहीं हूं तुम्हारा. तुम्हारे लिये मैने कितना अपनान सहा, कितनी बार गिडगिडाया ..... जिसके कदमों नहीं पटकना था उसके कदमों में सर पटका ....कई पैसे वालों से तो यह तक गुहार की कि, मेरी बेटी सुशील् है सुन्दर घर का सरा काम कर लेती है, बस एक दुर्घटना में उसका एक हाथ टूट गया, उसका इलाज़ मेरी सामर्थ्य के बाहर था है. आप सब तो पैसे वाले हो उसका इलाज़ करा लोगे लेकिन..........कोई तैयार नहीं हुआ बिटिया ....इस आदमी की तुम तीसरी पत्नी हो ....खूब पैसा है ....तुम सुखी रहोगी”.

“ पर कल को वह नहीं रहा तब ? यह नहीं सोचा तुमने ? मैं अकेले उसके धन की हक्दार नहीं यह नहीं सोचा तुमने ?”

“ तुमने भी तो किसी की कभी नहीं सुनी ..किसी की कभी नहीं मानी .....अपने मन की करती रही .... यदि तुम लडकी की तरह रहती, लडकी की तरह व्यवहार करती......घर का काम करती ....सीना पूरना सीखती तो काहे को ये दिन देखना पडता बिटिया. लदकियों का काम पेड पर चढ्ना, गुल्ली डंडा खेलना नहीं है ...... अब यही तुम्हारी नियति थी . यही तुम्हारा भाग्य था ...इसे स्वीकार करो ....वो पैसे वाला है तुम उसके साथ सुखी रहोगी”.

सवितरी ने जवाब दिया, “तो तुमने मेरा भाग्य तय कर दिया? मेरी नियति भी ? पिता हो ना तुम? बच्चों का भला बुरा सोचने वाले ? सच कहूं बाबू, तो तुमने कब जाना कि बेटियों का सुख और दुख क्या होता है, कब जाना कि वो भी इंसान हैं, कब कि उसके पास भी सपने हैं, कब जाना कि उसकी आंख का दर्द क्या होता है? आज के बाद अब मैं अपना भाग्य जीने जा रही हूं ....तुम्हारी दी अपनी नियति को स्वीकार करने जा रही हूं ...... आज के बाद हमारा तुम्हारा रिश्ता खत्म ..ना तुम बाप और ना मैं बेटी”.

फिर उसने पलट कर पिता की तरफ नहीं देखा. सुना है शादी के बाद लाख बुलावे के बाद भी वह पिता के घर वापस नहीं आयी .....रस्म अदायगी के लिये भी नहीं ....!

डॉ. अलका सिंह

● समाप्त ●

